प्रकरण दुसरे

# सुरेखा शहा लिखित 'जोहड' ची आशयसूत्रे


प्रास्ताविक

सुरेखा शहा यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय

सुरेखा शहा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीची आशयसूत्रे

१. पाणीप्रश्नाची यशस्वी सोडवणूक

२. जंगलरक्षणाची चळवळ

३. पर्यावरण रक्षण

४. खाणकामगारांचा प्रश्न

५. स्त्री जागृती

६. स्वावलंबन

७. एकजूट

८. कष्टाचे मूल्य

९. जगण्याचा लढा

समारोप

संदर्भ

प्रकरण दुसरे

# सुरेखा शहा लिखित 'जोहड'ची आशयसूत्रे

**प्रास्ताविक :**

मराठीतील इतर कादंबरीपेक्षा 'जोहड' ही कादंबरी आशयदृष्ट्या वेगळी ठरते. पारंपरिक कादंबरीमध्ये सामान्यत: एकच एक आशयसूत्र असते. सुरेखा शहा यांच्या 'जोहड'मध्ये असा प्रकार येत नाही. या कादंबरीत प्रणयजन्य घटना नाहीत. भावना उद्यपित करणारे चित्रण येत नाही किंवा नायक-नायिका येत नाहीत. ही एका कर्तृत्ववान, महापुरुषाच्या कार्याची चित्तथरारक कहाणी आहे.

या महापुरुषाच्या आयुष्याचे टप्पे विविध घटनाप्रसंगांतून उलगडताना दिसतात. एका नि:स्वार्थी, निधड्या छातीच्या, ध्येयवादाने भारावून जाऊन स्वत:ला कामामध्ये झोकून देणारा, मनापासून कार्य करणाऱ्या कर्मयोग्याची ही कहाणी म्हणता येईल. जमीनदाराचा मुलगा, राजेंद्रसिंह उच्चशिक्षण घेऊन डॉक्टर होतो. प्रकल्प अधिकारी म्हणून सरकारी नोकरीही मिळते. परंतु पारंपरिक नोकरीत न अडकता जल, जंगल, जमीन, पर्वत यांच्या संरक्षणार्थ राजस्थानच्या खेड्यात आपली कर्मभूमी शोधतो. सर्व काही सुरळीत चालू असले तरी आपल्याला काहीतरी वेगळे करायचे आहे, समाजाचे ऋण फेडायचे आहे ही भावना त्यांना स्वस्थ बसू देत नाही. नोकरीचा राजीनामा देऊन सोई-सुविधेने अभावग्रस्त, पाण्याविना तडफडणारी गावं, तिथले लोक आणि त्यांचे प्रश्न यावर मात करण्याचा ध्यास, पावसाचा थेंबन्‌थेंब अडविण्यासाठी, जमिनीत ओलावा राहण्यासाठी, पिकांचे उत्पन्न अनेक पटीने वाढण्यासाठी काही पारंपरिक पद्धतीच्या जलसंधारणाच्या क्लृप्त्या गावकऱ्यांच्या सहकार्याने आखतात. राजेंद्रसिंह व त्यांचा 'तरुण भारत संघ' मृतप्राय जीवनं समृद्ध करण्याचे प्रयत्न करतात.

या प्रकरणात सुरेखा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीतील आशयसूत्रे अभ्यासायची आहेत. त्यापूर्वी सुरेखा शहा यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून घेता येईल.

**सुरेखा शहा यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय :**

सुरेखा शहा या सोलापूर जिल्ह्यातील लेखिका आहेत. 'जोहड'कार म्हणून त्यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला आहे. मराठी साहित्यात त्यांचे फार मोलाचे योगदान आहे. त्यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९४० साली गुलबर्ग्याजवळील आळंद या छोट्याशा खेडेगावात जैन गुजराथी घराण्यात झाला. त्यांचे आजोबा मोतीचंद शहा यांना वाचनाची आवड असल्याने पुस्तकांचा मोठा संग्रह त्यांच्याकडे होता. आजोबांनी 'महेंद्र मुक्ता' या गुजराथी कादंबरीचे मराठीत भाषांतर केले. सुरेखा शहा आपल्या मुलाखतीत म्हणतात, ''आजोबा लेखक असल्याने लहानपणापासूनच वाचनाचे संस्कार होत गेले. वयाच्या दहाव्या वर्षी सुमारे ५०० पुस्तकांचे वाचन केले होते. आजोबांच्या साहित्याचा वारसा मिळाल्यानेच मी चांगल्या कादंबऱ्या लिहू शकले.''[१] आजोबा व वडील दोघेही आधुनिक विचारांचे होते. मुलींनीही मुलांप्रमाणे शिकावे अशी त्यांची विचारसरणी होती. आजोबांना वाचनाची आवड होती. त्याचप्रमाणे त्यांचे वडील रतनचंद मोतीचंद शहा यांनाही वाचनाची आवड होती. वडिलांच्या व आजोबांच्या सानिध्यात राहिल्याने सुरेखा शहांनाही वाचनाची आवड लागली. अनेक पुस्तके त्यांनी लहानपणीच वाचली होती. सहा-सात वर्षांच्या असताना गुलबर्ग्याला दंगल झाली. तेव्हापासून त्या सोलापूरलाच आजोळी मामांकडे राहू लागल्या. त्यांचे मामा कैलासचंद्र मेहता हे दयानंद कॉलेजमध्ये प्राध्यापक होते.

सुरेखा शहा यांचा वयाच्या चौदाव्या वर्षी चंद्रगुप्त शहा यांच्याशी विवाह झाला. त्यांना नववीपर्यंत शिक्षण घेता आले. नंतर संसार सांभाळून त्या लिखाण, वाचन करू लागल्या. १९९४ मध्ये 'जॉन केनेडी' (अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष) गेले आणि सुरेखाजींनी त्यांच्यावर पहिला लेख लिहिला. हेच त्यांचे साहित्य विश्वातील पहिले पाऊल! स्थानिक वृत्तपत्रात तो छापून आला. पुढे तो 'अमृत'मध्येही छापून आला. इथून पुढे त्यांच्या साहित्याचा आलेख चढतच राहिला. प्रथम त्यांचे लेखन 'माहेर', 'मेनका', 'जत्रा', 'मानिनी', 'प्रपंच', 'गृहशोभिका' अशा मासिकांतून सातत्याने प्रकाशित झाले.

कादंबरी वाङ्मयात त्यांनी मोलाची भर घातली आहे. त्यांची 'चक्रव्यूह', 'जन्मठेप', (१९७६) 'स्वप्न गवसले हाती', (१९६८) 'नायक', (१९६९) 'पानगळ',

(१९७६) 'वळवाच्या धारा', (१९७८) 'मृगजळ', 'हरवले ते', 'कहत बनारसी', 'जोहड' (२००२). 'पुत्रवती' (२००४) तसेच अलीकडची पाणीप्रश्नासंबंधीची 'महाराष्ट्राचे जलनायक' (२००६) ही कादंबरी अशा विविध कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. यातील काही नियतकालिकांतून तर काही मेनका प्रकाशनातर्फे, सुमेरू प्रकाशनातर्फे प्रकाशित झाल्या आहेत. त्यांच्या लेखनाविषयी मृणालिनी जोगळेकर म्हणतात, " ती एक सिद्धहस्त, बहुप्रसव, प्रासादिक लेखिका आहे."[२]

'जोहड' ही २००२ ला प्रकाशित झालेली सुरेखा शहा यांची कादंबरी. इतर कादंबऱ्यांपेक्षा ती आशयदृष्ट्या वेगळी ठरते. एकांकिका, ललितलेख, नाटके, कविता, महानाट्य, अनुवाद अशा अनेक प्रकारच्या साहित्यात त्या रमल्या. परंतु 'जोहड' ही कादंबरी या सर्व साहित्यात व कादंबऱ्यात वाचकांच्या मनावर छाप उमटवणारी ठरते. म्हणूनच 'जोहड' या कादंबरीला 'भैरूरतन दमाणी पुरस्कार' (२००२), अंकुर साहित्य संमेलनाचा 'अक्षर तपस्वी पुरस्कार' (२००२), मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा (कर्नाटक) चा 'डॉ. पं. आवळीकर स्मृती पुरस्कार', (२००४), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचा 'वा. म. जोशी पुरस्कार' (२००३) 'कवी रा. ना. पवार पुरस्कार' (२००२), 'श्री. ना. बनहट्टी पुरस्कार' (२००३), 'सामाजिक कृतज्ञता पुरस्कार' (२००४), 'शिवाजी सावंत कादंबरी पुरस्कार' (२००४), 'कमलाबाई फडके साहित्य पुरस्कार' (२००५), 'चेतना पुरस्कार' असे पुरस्कार मिळाले. त्यांच्या समग्र साहित्याला (२००४) 'मोरपीस गौरव पुरस्कार', 'मुलगा झाला हो' या एकांकिकेला, (१९९४) 'ऑल इंडिया रेडिओ'चे पारितोषिक प्राप्त झाले. 'फॅड फॅड आणि मॅड' या ही एकांकिकेला चार वर्षे 'वि. र. बाम पुरस्कार' असे विविध पुरस्कार मिळाले. सोलापूर, पुणे, कोल्हापूर आकाशवाणीवरून 'जोहड' या कादंबरीचे वाचन झाले आहे.

इतर कादंबऱ्यांप्रमाणे सुरेखा शहांनी 'जोहड'मध्ये उत्कंठावर्धक, विस्मयदर्शक कल्पना रेखाटल्या नाहीत. जीवनाचे वास्तव दर्शन घडविले आहे." जो लोग सिर्फ शाब्दिक चिन्तन में लीन हैं या कि " हिन्दुस्तान का कुछ नहीं हो सकता, सब भगवान भरोसे चल रहा है" कह कर महज भारतीय जनता की खिल्ली उडाते हैं उन के लिए यह किताब एक ठोस

जवाब है ।''[३] असे सुनीताजीने या पुस्तकाविषयी म्हटले आहे. याशिवाय रोमँटिक, कल्पनारम्य, आदर्शवादी अशा सर्वसामान्य विचारांपेक्षा ही कादंबरी वेगळी वाटते. या कादंबरीतील आशयसूत्रे पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

**सुरेखा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीची आशयसूत्रे :**

कथानक, भाषाशैली, निवेदन, पात्रचित्रण, प्रसंग, वातावरण हे सर्व कादंबरीतील घटक एकत्र बांधणारे सूत्र म्हणजे आशयसूत्र होय. आशय हा कादंबरीचा गाभा असतो. आशयाशिवाय कथा पूर्णच होऊ शकत नाही. कथानक आटोपशीर असल्यास आशयाला महत्त्व प्राप्त होते. पात्र, संघर्ष, निर्णयपर शेवट या तीन घटकात आशयसूत्र गुंफलेले असते. आशयसूत्राविषयी गंगाधर पाटील म्हणतात, ''आशयसूत्र म्हणजे साहित्यकृतीच्या आशयक्षेत्राचे किंवा अनुभव विश्वाचे केंद्रवर्ती व मध्यवर्ती सूत्र होय.''[४]

अलिकडच्या काळात स्त्रियांनी साहित्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भर घातली आहे. स्त्रिया आपले प्रश्न, समस्या, अनुभव कादंबरीतून व्यक्त करू लागल्या आहेत. पण सुरेखा शहांनी या सर्वांपेक्षा वेगळे असे 'जोहड' या कादंबरीचे लेखन केले आहे. '' सांस्कृतिक दहशतवादाविरुद्ध लढण्याचा जाहीरनामा म्हणजे 'जोहड' कादंबरी.''[५] असे सकाळचे संपादक अनंत दीक्षित यांनी या कादंबरीविषयी प्रतिपादन केले आहे. यात राजस्थानमधील आदिवासी लोकांच्या समस्या मांडल्या आहेत आणि त्या समस्या, प्रश्न राजेंद्रसिंह कशाप्रकारे सोडवतात याचे चित्रण या कादंबरीत आले आहे. यातील मुख्य आशयसूत्र आहे पाणी प्रश्नाची राजेंद्रसिंहांनी केलेली यशस्वी सोडवणूक. या आशयसूत्राबरोबर इतरही वेगवेगळी आशयसूत्रे 'जोहड' या कादंबरीत आढळून येतात. त्यांच्या 'जोहड' या कादंबरीची आशयसूत्रे पुढील प्रमाणे दिसून येतात.

**१. पाणीप्रश्नाची यशस्वी सोडवणूक :**

'जोहड' या कादंबरीत ठळकरूपात दिसून येणारे आशयसूत्र म्हणजे पाणीप्रश्नाची यशस्वी सोडवणूक. पाण्याअभावी पडीक राहिलेली शेतजमीन, तिथे असलेले वैराण वाळवंट, अर्धी घागर पाण्यासाठी मैलोन्‌मैल करावी लागणारी भटकंती, कोरड्या पडलेल्या

बंजर विहिरी, शेतातून काहीच उत्पन्न निघत नसल्याने स्थलांतर करणारे गावकरी, पाण्याअभावी उद्ध्वस्त झालेली अनेक गावे या प्रश्नांनी ग्रासलेला राजस्थानचा प्रदेश, याचे चित्रण या कादंबरीत येते. 'इथली माणसं क्षणाक्षणासाठी जगत होती आणि जगतानाही कणाकणातून प्रत्यही मरण भोगत होती.'[६] असे निवेदन कादंबरीत येते. यावरून पाण्याचा प्रश्न किती दाहक होता याची प्रचिती येते. हे चित्र बदलण्याचे स्वप्न पंचविशीतील एका ध्येयवेड्या कार्यकर्त्याने पाहिले व या भीषण पाणीटंचाईवर मात करण्यासाठी लोकसहभागातून व श्रमदानातून पावसाचे पाणी साठविणारे हजारो जोहड म्हणजेच तलाव बांधले. त्यामुळे अनेक लोकांचे पुनर्वसन झाले. गावेच्या गावे वसली गेली. पूर्वी जोहड म्हणजेच तलावामुळे पाऊस कमी असला तरी पीक चांगले यायचे, गुरे-ढोरे चरायची, दूध-दुभते भरपूर असायचे, तूप, दूध विकून गावकऱ्यांना पैसे मिळायचे. काही वर्षांनी ही परिस्थिती बदलते. जोहडची दुरावस्था झाल्याने अन्न नाही, धान्य नाही, पीक नाही, पाणी नाही, सर्वांचाच सर्वनाश चाललेला, असे चित्र अनुभवण्यास मिळते.

शेती नापीक, जनावरे हडकलेली, मोकळ्या उजाड रानात त्यांना शोधूनही चारा मिळत नाही, कुठूनतरी पाला ओरबाडून आणायचा आणि जनावरांना जगवायचे, म्हणूनच किशन आणि त्याच्या गावचे कितीतरी तरुण पोटासाठी गाव सोडतात. अशांसाठी काहीतरी करावयास हवे, माणसांना माणसासारखे जीवन जगता यावे या भावनेने झपाटून जाऊन लोकांमधील विचारप्रवनता व कृतीशीलता जागृत करण्याचा प्रयत्न राजेंद्रसिंह करतात.

एक दिवस राजेंद्रसिंह व त्यांचे मित्र नरेंद्र, केदार, सत्येंद्र, हनुमान हे सर्वजण राजस्थानमधील 'किशोरी' या गावात येतात. गावकरी त्यांना अतिरेकी समजतात. हे तरुण इथल्या अज्ञानी लोकांसाठी शाळा काढण्याचे ठरवतात किशोरी गावातील रखरखीत वाट, खोल खोल गुहेसारख्या रित्या विहिरी, पाण्याअभावी दिसणारे भकासपण त्यांना खायला उठते; पाण्याविना सारे शून्य आहे, असे त्यांना मनोमन वाटते. त्यांचा विचार बदलतो आणि इथल्या लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न हा पाण्याचा आहे हे त्यांच्या लक्षात येते. त्या दृष्टीने ते कामास सुरूवात करतात.

15395

BARR. B. [illegible] KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

तिथला जुना जोहड ते पहातात. तो शंभर-दीडशे वर्षांपूर्वीचा असतो. पाण्याबरोबर आलेली माती साचल्यामुळे तो निकामी झालेला असतो. पूर्वजांनी जर गाळ काढला असता तर ही परिस्थिती त्यांच्यावर आली नसती. प्रयत्न केला तर आताही पाण्याचे संकट नाहीसे होईल. हे गावकऱ्यांना पटवून द्यावे व कामाला सुरुवात करावी, शिवाय जोहड ही पाणी अडवण्याची एक उत्कृष्ट पद्धत आहे असे राजेंद्रसिंहांना वाटते.

पूर्वी जोहड असल्यामुळे पाऊस कमी असला तरीदेखील जनजीवनचक्र सुरळीत चालत होते. जोहड मुजल्याने पाण्याचा गंभीर प्रश्न उपस्थित होतो. पावसाचा थेंबनथेंब या जोहड मुळे अडवला गेल्याने जमिनीत मुरतो. त्यामुळे विहिरीत पाणी टिकून राहते, ओलावा राहतो, उन्हाळ्यातदेखील पाण्याचा साठा टिकून राहतो. गायीगुरांना, पिकांना पाणी मिळते.

जोहड बांधण्याची माहिती ही जुन्या लोकांना असणारच. त्यांचे मार्गदर्शन घेऊन जोहड बांधायचे राजेंद्रसिंह व त्यांचे साथीदार ठरवतात. काही वृद्धांनी राजेंद्रसिंहांना सांगितले की, पूर्वजांनी इथे जोहड बांधले होते. या गावकऱ्यांच्या मध्ये मांगू पटेलचे मार्गदर्शन त्यांना मोलाचे ठरते. तो म्हणतो, "... जिथं जोहड बांधायचा ती जागा कमी खर्चाची असायला पाहिजे. पाण्याचा दाब कमी पाहिजे, बांधाची भिंत बांधण्यासाठी त्या जागीच माती पाहिजे, तिथं पाण्याचा वेग कमी हवा, दगडांचा उतार आतल्या बाजूने पाहिजे. जोहडवर सर्वांचा हक्क पाहिजे. जोहड भरल्यावर जास्तीचे पाणी जाण्यासाठी अरुंद वाट पाहिजे."[७] मंगू पटेलचे विचार राजेंद्रसिंहांना पटतात.

अखरी, जहाजवाली, रुपारेल, तिलदेह या नद्याही आटतात. त्यामुळे ओढ्याला पाणी नाही असे मत गावकरी व्यक्त करतात. राजेंद्रसिंह त्यांना सांगतात की यासाठीच इथे जोहड बांधायचे आहे. सर्वांना पाण्याच्या थेंबाथेंबासाठी तरसावे लागते. ही स्थिती बदलण्यासाठीच आम्ही इथे आलोय आणि आम्हाला तुमची मदत हवी आहे. पूर्वी तुमच्या पूर्वजांनी पाण्याचा थेंबनथेंब जपून ठेवला होता. त्यामुळे पाऊस पडत होता, शेतात पिके येत होती, कुरणे हिरवी असल्याने दुभती जनावरे दूध देत होती. परंतु तुम्ही जोहड मधील गाळ न काढल्यामुळे अशी स्थिती तुमच्यावर आली आहे. ही स्थिती बदलण्यास हवी, 'या दोन-तीन महिन्यात जोहड पूर्ण झाला तर येत्या पावसाळ्यात याचा नक्की उपयोग होईल.

त्यासाठी उद्यापासूनच काम सुरू व्हायला पाहिजे, आधी भूमिपूजन करू !'[८] असे मत राजेंद्रसिंह व्यक्त करतात. त्यांना जोहडच्या कामाला लवकर सुरुवात करायची असते. परंतु जोहडच्या कामाला एकही व्यक्ती येत नाही. मित्र अथवा ज्यांच्यासाठी जोहड बांधणार आहेत ते गावकरी कोणीच येत नाही.

राजेंद्रसिंह कोणाचीही अपेक्षा न करता एकटेच कामाला सुरुवात करतात. काही दिवसानंतर मात्र कामाला मदत करायला कजौडी व जंबुरी येतात. नंतर हळूहळू गावकरीही येतात. एकाचे दोन, दोनाचे चार हात होऊन जोहड खणण्यास गती येते. जोहड भराभर एकमेकांच्या साह्याने पूर्ण होऊ लागतात. आसपासच्या गावातील लोक येवून जोहड पाहतात. आपल्याही गावात जोहड बांधण्यासाठी निमंत्रण देतात. त्या त्या गावच्या अनुभवी लोकांना विचारून जोहडच्या जागा निश्चित केल्या जातात. पावसाचे पाणी कुठे थांबते? ते कुठून येते, किती प्रमाणात वाहते, नदीजवळ कुठे बांध बांधावा? बांधाची रूंदी-लांबी किती असावी असा जोहड खणण्याबाबत राजेंद्रसिंह वृद्धांचा सल्ला घेतात. राजेंद्रसिंहांचा एक नियम होता. ज्या गावात दारु पिणारे आहेत किंवा दारु बनवली जाते त्या गावात जोहड बांधायचा नाही. लोक पाण्यासाठी आसुसले असल्यामुळे हे नियम पाळायला तयार होतात व आजूबाजूच्या गावातही जोहडच्या कामास सुरुवात होते.

गोपालपुरात एकमेकांच्या साथीने व राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाने चौतरेवाडीला, सिलीबावडीचा जोहड पूर्ण होतो. बाछडी गावच्या प्रेमाराम मेवालकडून तर 'बीचवाला जोहड', 'जंगलवाला जोहड' असे अनेक जोहड बांधले जातात. भालगावच्या ब्रजमोहन गुर्जरही गावकऱ्यांच्या सहकार्याने गावातील मतभेद मिटवून जोहड बांधतो. लोकांना समजते की पावसाचे पाणी अडवून साठवण्याची ही पद्धत आहे. यामुळे पाणीटंचाई काही प्रमाणात का होईना कमी होते. मधमाशांचे थवे फुलांच्या ताटव्याकडे झेपावेत तसे गावोगावचे लोक पुढे येतात. अनेक जोहड एकमेकांच्या सहकार्याने तयार होतात. ज्या स्त्रियांना दिवसभर पाण्याच्या शोधात फिरावे लागत होते, आराम कसला तो माहीत नसतो त्या स्त्रियांना आता भरपूर वेळ मिळतो. स्त्रिया म्हणतात, 'पूर्वी लांबवर कोसो दूर जाऊन पाणी आणण्यात अर्धा

दिवस जायचा. आता तर चुलीवरचा तवा गरम होईपर्यंत आमचं पिण्याचे पाणी भरुन होतंय.'[९]

जिद्दी व करारी असलेली ५५ ते ६० वर्षांची दडकीमाई राजेंद्रसिंहांच्या कार्याबद्दल ऐकून असते. लिलुंडा हे तिचे गाव डोंगरात वसलेले असते. पावसाचे दिवस आले की हे लोक लिलुंडाला येत. बाकीचे दिवस लिलुंडा ओस पडलेले असायचे. दडकीमाई याला कंटाळलेली असते. आपल्या पोराबाळांच्या, नातवंडांच्या नशिबी हे प्रसंग यायला नकोत, आपल्या गावासाठी काहीतरी करावे असे तिला तीव्रतेने वाटते. गावकऱ्यांचा विरोध पत्करून ती 'तरुण भारत संघा'त राजेंद्र भैय्यांना भेटायला जाते. राजेंद्रभैय्यांना दडकीमाई सांगते, ''बाबा, आमच्या गावचं हाल काय सांगू तुला? ना शेती ना भाती, आम्ही गुरं पाळतो, खवा, तूप करून विकतो झालं, दुसरा काही कामधंदा नाही. पण त्या गुरांना प्यायला पाणी आणि खायला चारा तरी नको का ?...'' ''येताना पाहिलं मी, तू जिथं जिथं जोहड बांधलेस तिथं कसं आबादीआबाद झालंय सगळं. माझ्या लिलुंड्याला पण जोहड बांधायचाय म्हणून तुझ्यापाशी आले. बांधशील ना ?''[१०] हे ऐकून राजेंद्रसिंह दडकीमाईला काही अटी घालतात. 'तिसऱ्या हिश्श्याचे पैसे गावकऱ्यांनी घालायचे, नशा करायची नाही, जोहड बांधण्यास सर्वांनी मदत करायची.' या सर्व अटी ती मान्य करते. जोहड बांधण्यासाठी स्वत:जवळचे दोन हजार चारशे रुपये मदत म्हणून देते. तिच्या नेतृत्वाने, मदतीने पाण्याच्या संकटातून गाव मुक्त होतो.

वाघासारख्या प्राण्यांचे व तिथे राहणाऱ्या लोकांचे पिण्याच्या पाण्याचे एकच ठिकाण असलेले सरिस्काच्या जंगलात वसलेले 'उमरी' हे गाव. तिथे राहणारी प्रेमली ही राजेंद्रसिंहांपुढे जोहड बांधण्याचा प्रस्ताव मांडते. जोहड बांधल्यामुळे प्राण्यांचा व माणसांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल, जंगल हिरवे राहील, नवीन झाडांची लागवड होईल, असे मत प्रेमली व्यक्त करते. ''आकाशातून बरसणारे हे धन धरतीच्या ओंजळीत साठविले पाहिजे.''[११] या उद्देशाने राजेंद्रसिंह तिथेही जोहडच्या कामास सुरूवात करतात. खाणींच्या कामावर जाऊन ज्यांची भयावह अवस्था झाली होती ते गावकरीही जोहड खणण्यास मदत करतात. शेती, जनावरे सांभाळून कुटुंब चालवतात. त्यांचे पूर्ववत आयुष्य चालू होते.

अरवरीच्या पात्राचे वाळवंट झालेले पाहून राजेंद्रसिंह त्या ठिकाणीही जोहड बांधण्यासाठी जागा निश्चित करतात. जोहड बांधणार त्या ठिकाणची जमीन सुपीक असल्याने तिथे भरपूर पीक यायचे. त्यामुळे जमीन मालकाला तरी विचारून पाहू, असा विचार सर्वजण करतात. परंतु रुढमलमीन आपले भरपूर उत्पादन देणारे शेत गावच्या कल्याणासाठी, जोहड बांधण्यासाठी देतो. त्या परिसरात 'बांडी जोहड', 'छोछावली जोहड', 'बाबजीका कच्चा बांध', 'नाहरसिंहका जोहड', 'समशानवाली जोहडी', 'साकडा का बांध', 'खनियावाली जोहड' असे अकरा जोहड बांधले जातात.

गुप्त झालेल्या अरवरी नदीला राजेंद्रसिंहांच्या व गावकऱ्यांच्या कष्टाने पुनरूज्जीवन मिळते. जोहड बांधल्यामुळे अरवरी पुन्हा वाहू लागते. जोधपूरचे महाराजा गजसिंहांना आपलाही भाग पाण्याच्या संकटापासून मुक्त व्हावा असे मनोमन वाटते. आसपासच्या खेड्यात ही पाण्याचे दुर्भिक्ष्य होते. मोजक्याच शहरात पाणी होते. इथल्या माणसांना पिण्यासाठी, शेतीसाठी मुबलक पाणी असावे अशी त्यांची इच्छा असते. त्यासाठी ते म्हणतात, ''त्यासाठी काय करायला हवं ते सांगा, पैशाची फिकीर करू नका. आमचे राज्य जरी खालसा झाले असले तरीही ही आमच्या पूर्वजांची भूमी आहे. म्हणूनच ही प्रजा आमचीच आहे हे आम्ही विसरलो नाही. आपण काहीही सांगावं आम्ही तयार आहोत. बोला, राजेंद्रसिंहजी, 'आम्ही काय करावं?'[१२] पाण्याच्या प्रश्नावर उद्‌बोधन करण्यासाठी पदयात्रा काढली जाते. सर्व गावकऱ्यांना मार्गदर्शन करून जोहडच्या कामास सुरुवात करतात आणि त्यातून जोहड पूर्ण होऊ लागतात.

राजेंद्रसिंहांच्या 'तरुण भारत संघा'च्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधून आजूबाजूचे गावकरीही जोहड च्या संदर्भात माहिती विचारतात. प्रचंड वेगाने ठिकठिकाणचे जोहड तलाव एकमेकांच्या साह्याने पूर्ण होतात. अनेक व्यक्तींकडून, संस्थांकडून आर्थिक मदत मिळवण्याचे प्रयत्न राजेंद्रसिंह करतात. सुरेखा शहा म्हणतात, ''जे पाणी आदिवासी समाज सहा महिने वापरू शकतो तेवढे पाणी शहरी समाज दोन महिने वापरतो. तर पंचतारांकित हॉटेलमध्ये तेवढेच पाणी एका दिवसासाठी वापरले जाते.''[१३] हे पाणी एकच पण परिस्थितीमुळे या पाण्याचा उपयोग कसा वेगवेगळ्या पद्धतीने केला जातो हे दिसून येते.

'तरुण भारत संघा'ने व राजेंद्रसिंहांनी या भागात जादू केली. राजस्थानमधील लोकांना पाण्याचे एवढे महत्त्व वाटत होते की ते म्हणतात, ''यहां जीवन से यदि कोई अपेक्षा है और कोई भी आकांक्षा है तो वह है पानी, और सिर्फ पानी!''[१४] असे बोलणाऱ्या या लोकांच्या शेतात तीन-चार मनापासून तीस-चाळीस मनापर्यंत उत्पन्न वाढते. पूर्वी जेवायलाही मिळत नव्हते. परंतु आता भरघोस पीक शेतात पिकते. गुरे-ढोरे, पक्षी-प्राणी, वृक्ष-वल्ली, गावकरी पाण्याच्या आगमनाने तृप्त होतात.

ज्या विहिरीत थेंबभर पाणीही पाहायला मिळत नव्हते, त्या विहिरी जोहड मुळे पाणी अडवल्याने भरतात. शेतजमीन हिरविगार होते. ही हरितक्रांती करण्यासाठी सरकारकडून तसूभरही मदत न घेता गावकऱ्यांच्या साथीने राजेंद्रसिंह जोहड तलावाची कामे पूर्ण करतात.

एकंदरीत 'जोहड' या कादंबरीत पाण्याच्या अभावाने त्रस्त झालेल्या जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण पहावयास मिळते. राजेंद्रसिंहांसारख्या कर्तृत्ववान युवकाच्या आगमनाने अनेक ठिकाणी जोहड तयार करून पाणीप्रश्नांची सोडवणूक होते. जोहड बांधल्यामुळे आटलेल्या अनेक नद्या वाहू लागतात. या कामात त्यांना गावकरी व तरुण भारत संघ मदत करतो. ओसाड, उजाड भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य कमी होते. लोक आनंदी जीवन जगू लागतात. 'पाणीप्रश्नाची यशस्वी सोडवणूक' हे सुरेखा शहा यांच्या कादंबरीतील महत्त्वाचे आशयसूत्र म्हणता येईल.

## २. जंगल रक्षणाची चळवळ :

जंगल ही राष्ट्राची संपत्ती आहे. त्याचे रक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. मानवाच्या हव्यासामुळे जंगलतोड होते. त्यामुळे अनेक दुर्मिळ वनस्पती नष्ट होत जातात. त्यांची आवश्यकता असल्यास त्या शोधूनही सापडत नाहीत. म्हणून वनस्पतींचे संवर्धन, संरक्षण होणे अत्यंत गरजेचे आहे. 'जोहड' कादंबरीत जंगल संरक्षणाची चळवळ दिसून येते.

या कादंबरीत सरिस्का हे जंगल येते. या जंगलात मीण, बलाई, गुर्जर हे धाडसी आदिवासी लोक राहात. आपला उदरनिर्वाह ते गायी, म्हैशी, शेळ्या यांचे दूध, तूप विकून, जळणासाठी लाकूडफाटा विकून औषधी वनस्पती विकून चालवित असत. जनावरांचा चारा

ही विनासायास मिळे. ही माणसे जंगली जनावरांना भित नसत. ते ससे, हरण, इतर पक्षी यांची हत्याही करत नसत. सरिस्का हे ठिकाण त्यांना पवित्र वाटे. या जंगलातील झाडा-झुडपांशी त्यांचे नाते जुळलेले होते. काही वर्षांत सरिस्कावासीयांचे जगणे मुश्किल होते. या जंगलातून येणाऱ्या-जाणाऱ्यांकडून जंगल विभागाचा माणूस दोन-चार रुपये घेतल्याशिवाय जाऊ देत नसे. सरिस्काच्या जंगलात राहणारा जयराम पैसे देण्यास नकार देतो. त्याच्यावर लाकडे तोडल्याचा आरोप केला जातो. हे आदिवासी या अधिकाऱ्याची प्रत्येक गोष्ट ऐकण्यास तयार होत. या त्रासाला येथे राहणारे लोक वैतागतात.

वनखात्याचे अधिकारी व नोकर जे लोक पैसे देतील त्यांना हवी तेवढी झाडे तोडू देत, हे अधिकारी जंगलाचे 'रक्षक नसून भक्षक झाले होते.'[१५] या राक्षसांनीच जंगलाचे भक्षण केले होते. त्यामुळे सरिस्काची हिरवाई नष्ट होऊ लागली होती. या बरोबरच आणखी एक क्रूर गुन्हा होत होता. प्राण्यांची, पशूंची शिकार होत होती. बाबू व सुलेमान यांना प्राण्यांची शिकार करण्याची सवयच लागली होती. रात्रीच्या वेळी पाणी प्यायला आलेल्या प्राण्यांची चाहूल लागताच शिकार केली जाई. वाघाच्या चरबी, दात, कातडी याला मागणी जास्त असल्याने त्याची कमाई भरपूर होई. काहीजण हौसेखातरही शिकार करत. वनविभागाचे अधिकारी त्यांना सामील असल्याने ही शिकार राजरोसपणे चाले. गावकऱ्यांचा जीव या प्राण्यांसाठी व वनस्पतींसाठी तळमळत असे. तेथील लोक अज्ञानी असल्याने काहीच करू शकत नव्हते.

जयराम व इतर गावकरी मिळून राजेंद्रसिंहांना भेटण्याचा निर्णय घेतात. राजेंद्रसिंहांना भेटून सर्व हकीकत सांगतात. पैसे घेऊन चालणारी वृक्षतोड, शिकार, जमिनीची होणारी धूप या समस्या राजेंद्रसिंहांना ते सांगतात. राजेंद्रसिंह त्यांना मदत करायला तयार होतात. राजेंद्रसिंह जंगल अधिकाऱ्याविरूद्ध बंड करण्यास सांगतात. कुणीही येण्या-जाण्याचे पैसे द्यायचे नाहीत. भिऊन राहायचे नाही, याविरूद्ध आवाज उठवायचा; अन्यायाला बळी पडायचे नाही. जेवढे अन्याय सहन करुन तेवढे अन्याय होत राहतील. त्यांच्याशी लढायला तयार झाले पाहिजे. यासाठी तुम्हाला मदत मिळेल अशी राजेंद्रसिंहाकडून ग्वाही मिळते. त्यामुळे अन्यायाविरूद्ध पाऊल उचलण्यास गावकरी तयार होतात. त्यांना राजेंद्रसिंहांचा

खंबीर पाठिंबा मिळालेला असतो. नद्या, डोंगर, झाडी याचे महत्त्व त्यांना पटते. "...आपल्याला जसा जगायचा हक्क आहे तसाच जंगलातल्या प्रत्येक प्राण्याला तो हक्क आहे. तसाच प्रत्येक झाडाझुडपालादेखील. झाडं असतील तर तुम्ही-आम्ही जगू. झाडं असतील तर पाणी राहील, झाडं जगतील तरच तुमचं कल्याण आहे."[१६] हे निसर्गाचे सूत्र राजेंद्रसिंह पटवून देतात.

वनस्पतींची हत्या थांबविण्यासाठी, त्यांचे संगोपन, संवर्धन होण्यासाठी राजेंद्रसिंह जयरामच्या आईला जंगलातील औषधी वनस्पतींची माहिती असल्याने तिच्याकडून सर्वांना एकत्र करुन अनेक दुर्मिळ होत चाललेल्या वनस्पतींची माहिती देतात. तेथे दवाखान्याचीही सोय नसल्याने वनऔषध हाच रामबाण उपाय असतो. राजेंद्रसिंहांनी आयुर्वेदाचा अभ्यास केला असल्याने त्यांना काही वनस्पतींची माहिती असते. प्राणी आजारी असल्यास औषधी झाडांचा पाला खातात. चंद्रहास, सिंदुवार, काळी गुनेसर हिला कृष्ण सारिवाही म्हटले जाते. शतावरी, शंखपुष्पी, ब्राह्मी, आवळा, गुग्गुळ, अपामार्ग, खदिर, कुटज, गुंजा, द्रोणपुष्पी, पळस, चित्रक, सहदेवी अशा अनेक वनस्पती दाखवतात व त्यांचे कोणते उपयोग आहेत याचीही माहिती सर्वांना करून देतात. ज्या वनस्पती दुर्मिळ होत चालल्या होत्या त्यांची पुन्हा लागवड करण्याचा निर्णय घेतला जातो. त्यामुळे तेथील लोकांना औषधी वनस्पतींची माहिती मिळते. या निमित्ताने वनस्पतींचे संवर्धन होईल अशी अशा त्यांना वाटते.

बेकायदा शिकार, जंगलतोड केल्यामुळे जंगलाचे वैभव नष्ट होत होते. सुलेमान हा बेकायदेशीर कामे करीत असे. हे सर्वांनाच माहीत होते. या निमित्ताने राजेंद्रसिंह त्याला भेटतात. त्याने केलेली बेकायदेशीर कामे त्याला आठवतात. राजेंद्रसिंह त्याला समजावून सांगतात. त्यालाही ते पटते. तो राजेंद्रसिंहांची क्षमा मागतो. तो पूर्णत: बदलतो. तो म्हणतो, "...मी शिकार करणार नाही. चोरासारखं जगण्यापेक्षा राजासारखे जगेन मी."[१७] सुलेमानमध्ये परिवर्तन होते. वाघांची, हरणांची व इतर प्राण्यांची शिकार करणाऱ्यांसाठी लोकांमध्ये उद्‌बोधन होण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात येते. त्यात वन्यप्राण्यांचे संरक्षण, वृक्षांचे संवर्धन कसे करावे या विषयीची माहिती दिली जाते. सरिस्का नष्ट होऊ

द्यायचे नाही असाही निश्चय या शिबिरात केला जातो. बेकायदेशीर काम करणाऱ्या व्यक्तींविरूद्ध लढण्यास सर्वजण तयार होतात. या शिबिराने लोकांच्यामध्ये परिवर्तन घडते.

बेकायदेशीर वाघांची शिकार केल्याचा, त्यांचे कातडे विकल्याचा आरोप वन्यप्राण्यांचे, झाडाझुडपांचे रक्षण करणाऱ्या राजेंद्रसिंहांवर व त्यांच्या साथीदारांवर घातला जातो. त्यांच्यावर केस केली जाते. परंतु वृक्षतोडीची ती बातमी खोटी असल्याने सर्वजण लगेच सुटतात. जंगल संरक्षण करणाऱ्या राजेंद्रसिंहांवर केस केल्याबद्दल त्या व्यक्तीविरूद्ध लढा देण्यासाठी तीन-चारशे पुरुष, स्त्रिया तयार होतात. सुलेमानची बेकायदेशीर कामे थांबवल्याने अधिकाऱ्यांचा काहीच फायदा होत नसतो. त्यामुळे हा चुकीचा आरोप राजेंद्रसिंहांवर केलेला असतो.

गावकऱ्यांना जंगलाचे महत्त्व पटवून देण्यासाठी, जंगल वाचविण्यासाठी, जंगलाचे संरक्षण करण्यासाठी आटोकाट प्रयत्न चालू होतात. भर्तृहरीच्या जंगलात गळून पडलेल्या लाकडांचा यज्ञ केला जातो. वृक्ष संवर्धन व्हावे ही या यज्ञामागील भूमिका असते.

पूर्वीच्या लोकांच्या बऱ्याच परंपरा होत्या. त्या टिकून आहेत म्हणून वनस्पती व जंगले शिल्लक आहेत. दोन गावांमध्ये झाडे लावून तिथे मंदिराची स्थापना करायची. त्याला 'काकडबनी' म्हणत. त्या मंदिराच्या आजूबाजूची वृक्ष नव्हे तर पाने देखील तोडायची नाहीत. याला 'रखतबनी' म्हणत; देवाच्या नावाने जमीन सोडून वृक्ष लावले जात त्याला 'देवारण्य' म्हणत; दानी मंडळी गायी गुरांसाठी पुजाऱ्यास जमिनी देत. येथे शेती केली जात नसे त्याला 'वाल' म्हणत. एखाद्या सिद्ध पुरुषाची समाधी असलेल्या ठिकाणचे कुणीही वृक्ष तोडत नसे, त्याला 'देवबनी' म्हणत. अशा श्रद्धेमुळे व समजुतीमुळे अनेक जंगले अस्तित्वात असलेली दिसतात. अन्यथा त्यांचे संवर्धन होणे कठीण होते.

अशा पद्धतीने संघर्ष, मार्गदर्शन, आंदोलन करून या जंगलाचे रक्षण केले जाते. भकास असणारी जंगले या चळवळीमुळे हरित होतात. जंगलाचे संवर्धन होते. दुर्मिळ असणारी झाडे औषधासाठी, तर इतर कामासाठी आवश्यक असणाऱ्या वनस्पती शिल्लक राहतात. राजेंद्रसिंहांच्या अविरत प्रयत्नाने व गावकऱ्यांच्या साथीने हे जंगल रक्षणाचे काम

पूर्णत्वास जाते. त्यामुळे 'जंगल रक्षणाची चळवळ' हे आशयसूत्र 'जोहड' कादंबरीमध्ये विशेषत्वाने दिसून येते.

## ३. पर्यावरण रक्षण :

हजारो वर्षांपूर्वी वसलेला, राजस्थानशी संलग्न असलेला अरवली हा पर्वत. या पर्वताचा जन्म एका सागरातून झाला आहे. भूकंपासारख्या निसर्गप्रकोपाने सागरातून या पर्वताचा जन्म होतो. गगनाला भिडणारी त्याची पर्वतशिखरे दिततात. बर्फाच्छादित हिमालयाचा तेव्हा नामोनिशान ही नव्हता. त्याचा जन्म आरवलीने पाहिलेला असतो. अरवली ही त्याची आईच! असा हा विस्तृत सर्वगुण संपन्न सौंदर्याने नटलेल्या प्रचंड मोठ्या भूप्रदेशाचा नाश होताना पाहणे शक्य नसते. परंतु अरवलीच्या काही भागात चाललेली बेसुमार जंगलतोड, खाणकामगारांचा 'सिलिकोसिस' सारख्या आजाराने होणारा मृत्यू, वाघांची चाललेली शिकार, जंगलाचे होणारे नुकसान, या सर्वांमुळे पर्यावरणाचा बिघडणारा समतोल हे निसर्गाचे, पर्यावरणाचे चित्र पाहून राजेंद्रसिंह चिंतित होतात. विद्ध्वंस, विनाश थांबवण्यासाठी ते निसर्गाचा जीर्णोद्धार करतात. त्यातून फुलणाऱ्या निसर्गदेवतेची प्राणप्रतिष्ठा करतात. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी 'अरवली चेतना पदयात्रे'चे आयोजन करून लोकजागृती करतात. अरवली वाचवण्यासाठी प्रतिज्ञा करून 'अरवली बचाव' आंदोलनाची मुहूर्तमेढ रोवली जाते. अरवलीच्या रांगा जिथपर्यंत पसरल्या आहेत तिथपर्यंत पदयात्रा काढण्यात येणार असते. गावोगावच्या लोकांना पर्यावरण रक्षणाची जाणीव करून देण्यासाठी, लोकांमधील कर्तव्याची भावना, आत्मसन्मान जागृत करण्यासाठी या पदयात्रेचे नियोजन करतात. या पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळतो. याला सुसूत्रता येण्यासाठी राजेंद्रसिंह काही नियम बनवतात.

- 'अरवली पर्वतक्षेत्राच्या पर्यावरण आणि स्थितीच्या संरक्षणासाठी या चेतना यात्रेत शासकीय आणि इतर संस्था यांचे सहकार्य घ्यावे.
- अरवली क्षेत्रातील जैविक विविधता आणि जलस्त्रोत अबाधित ठेवण्यासाठी अभयारण्य, वनरक्षण योजना लोकांच्या सहकार्यातून केली जावी.
- अरवलीच्या नैसर्गिक संपत्तीच्या माहितीसाठी आणि त्यात होणाऱ्या बदलाच्या अभ्यासासाठी 'अरवली पर्वतीय क्षेत्र शोध संस्थान' स्थापन करावे.

● अरवली क्षेत्रात वन्यप्राण्यांची शिकार, वृक्षतोड, गुरे चराई आणि खाणी यावर पूर्ण बंदी घालावी.

● अरवली क्षेत्रात ज्या नद्या, झरे आहेत, त्यांचे संरक्षण करून त्यांचा योग्य उपयोग करण्याचा प्रयत्न करावा.

● सध्या राज्यात चालू असलेल्या अठ्ठावीस हजार खाणींपैकी अरवली वनक्षेत्रात ज्या खाणी आहेत त्यांवर पूर्ण बंदी घालावी. या क्षेत्राबाहेरील केवळ वैज्ञानिक पद्धतीने चाललेल्या खाणींना परवानगी द्यावी.

● या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी कार्यवाही होते का नाही, ते पाहण्यासाठी प्रत्येक गावातून समिती नेमावी.

● अरवली बचाओ आंदोलन प्रभावीपणे कार्यवाहीत आणण्यासाठी राष्ट्रीय, प्रांतीय व स्थानिक, क्षेत्रीय स्तरावर समन्वय समित्या स्थापन कराव्यात.'[१८]

यानुसार ठराव होऊन २ ऑक्टोबर १९९४ रोजी शुभारंभ होतो. गुजरातमधील हिंमतनगर व अन्य चौदा गावांतून एकाचवेळी सुरुवात होते. बावीस नोव्हेंबरला दिल्लीच्या जंतरमंतर मैदानात सांगता होते. यात पर्यावरणाचा चाललेला नाश, वाळवंटाचे विस्तारणाचे क्षेत्र, वृक्षतोडीमुळे दिवसेंदिवस पावसाचे कमी होणे, संपुष्टात आलेली गायराने यावर भाषणे होतात, चर्चा होते. चेतना यात्रा येथे संपली तरीही आंदोलन सुरूच राहणार असते.

वृक्षांचे जतन, संवर्धन व्हावे म्हणून आपल्या संस्कृतीने, परंपरेने कुलदैवताप्रमाणे वृक्षदैवतांचीही प्रथा पाडली आहे, त्याला 'धराडी' असे म्हणतात. 'प्रत्येक घराण्याचं म्हणून एक वृक्षदैवत असतं आणि त्या घराण्यातील लोक तो वृक्ष कधीही तोडत नाहीत. त्याचे लाकूड वापरीत नाहीत. त्याची पूजा करतात.'[१९] याला धराडी असे म्हणतात. याचा मुख्य हेतू असतो तो म्हणजे वृक्षाची तोड होऊ नये, पर्यावरणाचे रक्षण व्हावे, वृक्षांबद्दल कृतज्ञता निर्माण व्हावी. यासाठी 'धराडी' ही प्रथा असते. त्यासाठी राजेंद्रसिहांकडून 'धराडी'चे संमेलन अनेक गावकऱ्यांच्या सहकार्याने भरवले जाते. या कादंबरीत 'धराडी' भोवती गुंफलेल्या अनेक कथा गावकरी सांगतात. त्यामुळेच जंगलाचे संवर्धन होते. सोमू नावाचा गावकरी सांगतो, ''आम्ही झाडांना आमच्या जीवनाचा एक भागच समजतो. त्या झाडातला रस म्हणजे आपल्या नसातून वाहणाऱ्या रक्तासारखाच आहे. प्रत्येक झाडाचे एकेक पान

पवित्र व पूज्य आहे. ही जमीन आणि पहाड आमच्या पूर्वजांच्या राखेपासून बनले आहेत. त्यावर उगवणारी झाडे आमच्या नात्याचीच नाहीत का ?''[२०] या गावकऱ्यांचे झाडाविषयीचे प्रेम, उत्कटता यातून व्यक्त होते. 'धराडी' सारख्या प्रथांमुळेच पर्यावरणाचे संवर्धन होते.

'धराडी'च्या तीन दिवसाच्या संमेलनात अनेकजन धराडीमागील कथा सांगतात. नवीन वृक्षांची लागवड करावी म्हणजे पर्यावरणास कोणताही धोका पोहोचणार नाही अशी चर्चा होते. आपली सृष्टी समाधानी असेल तरच आपण समाधानी राहू हे विचार राजेंद्रसिंह अत्यंत कळकळीने लोकांना सांगतात.

सरिस्काच्या जंगलात राहणारे मीण, गुर्जर जंगलाची हानी होऊ देत नसत. परंतु जेव्हा हे जंगल स्वातंत्र्यानंतर वन विभागाकडे जाते तेव्हा त्याचा नाश होऊ लागतो. कुसुम कार्निक व आनन्द कपूर पर्यावरणाविषयी म्हणतात, ''हमारी विकास और पर्यावरण नीति पर यह दृष्टि हावी रहे कि पर्यावरण और जैव संपदा का अस्तित्व सिर्फ मानव उपभोग के लिए जरूरी नहीं है, बल्कि उनका बना रहना अपने आप में महत्त्वपूर्ण है, तो हम शायद आनेवाली पीढियों को रहने लायक धरती दे सके !''[२१]

पर्यावरण रक्षणाच्या जाणिवेने प्रेक्षणीय स्थळ असणाऱ्या सरिस्का जंगलात अतिक्रमण करून हॉटेलचे बांधकाम चालू असते. परंतु गावकरी व राजेंद्रसिंह त्याला विरोध करण्यासाठी रामायणपाठाचे आयोजन करतात. त्यामुळे बांधकाम थांबले जाते. हे हॉटेल झाले असते तर पर्यावरणाची, तेथील प्राण्यांची, वृक्षांची हानी रोखणे शक्य झाले नसते.

मत्स्य विभागाची परवानगी घेऊन ठेकेदार मासे पकडण्यासाठी अरवरीच्या पात्रात येतात. गावकरी मासे कुणालाही पकडू देत नसत. जर कोणी पकडलेच तर त्याला दंड केला जाई. त्या ठेकेदारालाही मासे पकडण्यास विरोध करतात. अशाप्रकारे या गावकऱ्यांच्या 'डोळ्यात दिसत होती अन्यायाबद्दलची चीड, स्वत:च्या हक्कांची जाणीव आणि जलचराबद्दलचे प्रेम.'[२२] या प्रेमापोटीच ठेकेदाराला मासे पकडण्यास विरोध करतात. परंतु खवळलेला अधिकारी नदीत अेंड्रीन ओततो. मासे मरतात, पर्यावरणाची ही हानी पाहून संतप्त जमाव तीव्र आंदोलन पुकारतो.

पुराच्या नैसर्गिक आपत्तीमुळे असंख्य प्राणी, माणसे अकाली मरण पावतात. पूर ओसरल्यानंतर काही दिवसातच दुर्गंधी पसरल्यामुळे, रोगांना आमंत्रण मिळते. मलेरिया, ताप, कॉलरा या सारखे रोग पसरतात. यामुळे पर्यावरणाची स्थिती फारच गंभीर होते. हा प्रसंग पुन्हा ओढवला जाऊ नये म्हणून चर्चासत्रांचे आयोजन केले जाते. राजेंद्रसिंह म्हणतात, ‘‘नद्यांच्या आसपासचे जंगलाचे पट्टे नष्ट करणं म्हणजे पुराला आमंत्रण देणं आहे. जिथे जंगल आहे त्याच्या आसपासच्या गावात पूर आला नाही. कारण जंगलात पावसाचं पाणी शोषून घेण्याची क्षमता असते. कुणालाही नैसर्गिक जलमार्गाचा निचरा बंद करून पाणी अडवून ठेवण्याचा अधिकार नाही.’’[२३] पुराच्या नियंत्रणावर अनेकजण अनेक उपाय सांगतात. राजेंद्रसिंह शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हणतात, ‘‘महात्मा गांधी म्हणाले होते की ही भूमी तुमच्या गरजा सहज पूर्ण करू शकते परंतु तुमची लालसा पूर्ण करू शकत नाही म्हणूनच निसर्गाला ओरबाडू नका. आपणही त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागले पाहिजे.’’[२४] हा गांधींचा राजेंद्रसिंहानी सांगितलेला सल्ला या गावकऱ्यांसाठी मोलाचा ठरतो.

या सर्वांवरून असे म्हणता येईल की पर्यावरणाचे रक्षण करणे ही कुणा एकाची जबाबदारी नाही तर ती सर्वच नागरिकांची जबाबदारी असते. पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने, वृक्षतोड केल्याने महापुरासारख्या आपत्तींना कशाप्रकारे सामोरे जावे लागते याचे चित्रण या कादंबरीत येते. पर्यावरणाचा समतोल राखला जावा म्हणून वृक्षाच्या संवर्धनाबाबत धराडीसारख्या अनेक प्रथा या कादंबरीत दिसून येतात. त्यामुळे ‘पर्यावरण रक्षण’ हे आशयसूत्र ‘जोहड’ मध्ये ठळक होताना दिसते.

### ४. खाणकामगारांचा प्रश्न :

अरवली पर्वताच्या कुशीत वसलेल्या सरिस्का जंगलाला व तेथील लोकांना मृत्यूच्या खाईत ढकलले जात होते. चार राज्यात पसरलेला हा पर्वत सर्वांना परिचित असतो. त्यातील सत्तावीस हजार चौरस किलोमीटर क्षेत्र हे वनक्षेत्र म्हणून घोषित होते. यात राष्ट्रीय उद्याने, वाघांसाठी वन्यप्राण्यांसाठी अभयारण्य असतात. अशा सर्वसंपन्न अशा अरवली पर्वतातील काही भागात खाणमालकांनी हैदोस माजवलेला असतो. तेथे संगमरवर, ग्रॅनाईट, कोटा, स्टोन सॅड, स्टोन, जिप्सम, सॉफ्ट स्टोन... अशा अनेक खाणी जन्मल्या होत्या.

अठ्ठावीस हजार खाणींची कामे सुरु होती. या खाणीमुळे अनेक संकटे कामगारांच्या जीवावर बेतली होती. खाण कामगारांच्या शरिराची प्रतिकारशक्ती संपली की त्यांना 'टीबी' किंवा 'सिलिकोसिस'सारखे रोग होत व ते खंगून मरत. 'खाणमजुरांच्या या वस्त्यावस्त्यावर मृत्यू घिरट्या घालीत होता. त्याला इथं भक्ष मिळत होतं. आता मात्र राजेंद्रनी ठरवलं की, या बाबतीत निश्चित अशी उपाययोजना लागलीच केली पाहिजे, नाहीतर या सरिस्काच्या भूमीचे स्मशान होईल. मृत्यूचे हे भीषण तांडव तीव्र होण्यापूर्वीच त्याचे आक्रमण रोखण्याचा प्रयत्न केला पाहिजे...'[२५]

शेती करून आनंदाने राहणारे चेहरे, खाणीच्या कामामुळे मात्र भकास रुक्ष दिसतात. तरुण वयातच म्हातारे होऊन मरणाला सामोरे जाण्याची वेळ त्यांच्यावर येते. त्यांच्या मुलांना, विधवांना कोणतीच आर्थिक मदत खाणमालक करत नव्हते. खाणकामगार हसन म्हणतो, "भैय्या, जमुखारागढमध्ये दोन महिन्यांपूर्वी खाण खचली त्यात तीन मजूर गाडले गेले. त्यांचे मुडदे त्या खाणीतून वरतो काढायला पोलिसांना तीन दिवस लागले. त्यावेळी तो खाणमालक पळून गेलाय ते त्याचा अजून पत्ता नाही."[२६] अशा परिस्थितीत मदत मिळत नाही. खूप प्रयत्न करून खाण बंद पाडली जाते. पन्नास हजार रुपये तिथल्या विधवेला दिले जातात. आजारी व्यक्तिंना औषधोपचारही केला जात नसे. मलमपट्टीसुद्धा केली जात नसे. अशा बिकट अवस्थेत लहानापासून वृद्धापर्यंत सर्वच लोक सापडतात त्यांना रोजच्या किमान गरजा भागविण्यासाठीसुद्धा तीव्र झगडा द्यावा लागतो.

या खाणीमुळे जीवनावश्यक अन्न, पाणी यावरही दुष्परिणाम होत होता. मजूर एकमेकांशी बोलले तरीही त्यांना कामावरून कमी केले जाई. इतर ठिकाणीही त्यांना काम मिळू देत नसत. अशा खडतर परिस्थितीत जगणारे हे लोक. त्यांना त्यांच्या जातीपातीवरून मजुरी दिली जात असे. यापेक्षा मरणाला सामोरे जावे असे खाण कामगारांना वाटत असे. या खाणींनी त्यांच्यावर मृत्यूच ओढवला जात होता. एकजण म्हणतो, "भैय्या, या खाणी नाहीत. मरणाची तोंडं झालीत बघा."[२७] खाणीच्या खंदकात पडून कितीतरी जनावरही मरतात. खाणीमुळे त्यांना चरायला जागा नसते. शेतीही त्यातच जाते. आबादी आबाद

असणारी गावे बरबादीच्या डोहात ओढली जातात. अशा स्थितीतही गावकरी गाव सोडायला तयार नसतात. खाणकामगारांना दारुचे व्यसन लावले जाते. एखाद्याने आगाऊ पैसे घेतले तर त्याला त्रास दिला जाई. खाणीतून काढलेले दगड घासणाऱ्या कामगारांना फुफ्फुसाच्या आजाराला सामोरे जावे लागे.

खाणीत लावलेल्या सुरुंगाच्या आवाजाने जंगलातील प्राणी भीत. या प्राण्यांना कुणाचाही आश्रय नव्हता. सरिस्काच्या जंगलातील दुर्मिळ होत चाललेल्या वनस्पतींचाही नायनाट होत होता. जंगल अधिकाऱ्यांची व ठेकेदारांची दिवाळीच चालू होती. हे स्वार्थी लोक पैशाच्या आमिषाने निसर्गाचा, तिथल्या लोकांचा, पर्यावरणाचा, वन्यप्राण्यांचा विचारच करत नव्हते. काळजाचा ठाव घेणाऱ्या नरकयातनेतून त्यांना बाहेर काढण्याचा निश्चय राजेंद्रसिंह करतात. याविरूद्ध लढा द्यायला गावकरीही तयार होतात. 'जे काही व्हायचं असेल ते होऊ दे. नाहीतरी आम्ही या खाणीत काम केल्यामुळं रोग होऊन कुजून मरत आहोतच. त्यापेक्षा त्यांच्याशी झगडा करताना मेलो तरी चालेल.'[२८] असे गावकऱ्यांना वाटते.

खाण्या-पिण्याचा प्रश्न सुटण्यासाठी सरिस्काला नवे रूप, नवा बहार येण्यासाठी जोहड बांधावेत. त्यामुळे मजुरी मिळेल व तो भाग सुजलाम् सुफलाम् ही होईल असे ठरवले जाते. 'तरुण भारत संघ' व गावकरी मिळून पूजा करून जोहड बांधण्यास प्रारंभ करतात. अनेक संस्था आर्थिक मदत करतात. जोहड तलाव वेगाने होऊ लागतात.

खाणमालकांचा पैशाचा ओघ कमी होतो. खाणमालक खवळतात. त्यांची सुडाची भावना जागृत होते. सर्व आदिवासींच्या मागे 'तरुण भारत संघ' व राजेंद्रसिंह असणार हे सत्य त्यांना प्रखरपणे दिसते.

या खाणकामगारांना पुन्हा त्या खाईत जायचे नसते. त्यांच्या झोपड्यावर दगडफेक होते. त्यांना येता-जाता मारहाण होते. हे सर्व अन्याय सहन करण्याची ताकद त्यांच्या ठिकाणी निर्माण होते. अन्यायाविरूद्ध लढून न्यायाला सामोरे जायला ते तयार होतात. त्यांच्यात एकीचे बळ सळसळते. त्यांना कशाचीही भीती राहत नाही. या भूमीसाठी जगायचे,

खायला काही मिळाले नाही तरी चालेल पण पुन्हा खाणीच्या कामावर जायचे नाही असा निश्चय सर्वजन करतात.

'अरवली वाचवा' यावर 'तरुण भारत संघ' एका दिवसाच्या शिबिराचे आयोजन करतात. शिबिराच्या ठिकाणीच भिकमपुरात राजेंद्र भैयावर प्राणघातक हल्ला होतो. हा हल्ला खाण मालकांनी घडवून आणलेला असतो. राजेंद्रसिंह त्यांच्या ध्यानी-मनी-स्वप्नी दिसत होते. राजेंद्रसिंहांना संपविल्याशिवाय त्यांना शांती मिळणार नसते. परंतु लोकांच्या सहकार्याने ते वाचतात. या स्थितीतही शिबिराला सुरुवात करून ते मार्गदर्शन करतात.

अशाप्रकारे 'जोहड' मध्ये 'खाणकामगारांचा प्रश्न' हे आशयसूत्र ठळक रुपात दिसते. सुरेखा शहांनी खाणकामगारांच्यावर ओढवलेल्या अनेक समस्या त्यांचे प्रश्न यातून गावकरी राजेंद्रसिंहांच्या साह्याने कशा प्रकारे मार्ग काढतात; खाणीच्या कामामुळे 'सिलिकोसिस' या रोगामुळे लोकांची झालेली भयानक स्थिती या सर्वांमुळे त्या लोकांचे भावनाशून्य झालेले मन या कादंबरीत दिसून येते.

## ५. स्त्री जागृती :

'जोहड' या कादंबरीमध्ये स्त्री जागृत हे आशयसूत्र दिसून येते. राजेंद्रसिंह मातीचे बंधारे बांधतातच पण ते मनामनातील आस्मितेचे, आत्मीयतेचे, स्वत्वाला जागे करण्याचे, आदिवासी स्त्रियांच्या करपलेल्या मनाला खऱ्या अर्थाने जागृत करण्याचे काम करतात. त्यांना जीवनाचा खरा अर्थ समजावून देतात. या कादंबरीत लक्ष केंद्रित करणारी एक गोष्ट विशेषत्वाने जाणवते, ती म्हणजे आदिवासी स्त्रियांचा प्रत्येक कामात वाढत जाणारा सक्रिय सहभाग. येथील स्त्रिया समाजोन्नतीसाठी स्वत:ला झोकून देतात. राजेंद्रसिंहांनी स्त्रियांमध्ये केलेला बदल हा विशेष स्वरूपाचा दिसतो. राजेंद्रसिंहांचा हा उद्‌बोधनाचा हेतू स्त्रियांनीच प्रथम ओळखलेला पहावयास मिळतो. राजेंद्रसिंह ओसाड, उजाड गावात जोहड बांधण्यास सुरवात करतात. गावकरी व मित्र त्यांची साथ सोडतात. परंतु तिथल्या 'कजौडी' व 'जंबुरी' या स्त्रिया त्यांना प्रथम उत्स्फूर्तपणे मदत करतात.

यामुळे तेथील आदिवासी महिलांना स्वत:च्या अस्तित्वाबद्दल, भविष्याबद्दल विश्वास वाटू लागतो. अनेक स्त्रियांना एकत्र आणून शिबिराचे आयोजन केले जाते. त्याचप्रमाणे गावच्या प्रश्नावर चर्चा करण्यास, मार्ग काढण्यास, नवीन कामाबाबत काही बोलण्यास, ग्रामसभेच्या कार्यात, या सर्वांमध्ये महिलांचा सहभाग वाढला जातो.

आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक बाबतीत ग्रामीण महिलांसाठी 'तरुण भारत संघ' असामान्य कार्य करतो. दर पंधरा दिवसाला ग्रामसभा होई. यामध्ये गावच्या सुधारणेविषयी, समस्येविषयी बोलले जाई. हे निर्णय पूर्वी पुरुष घेत. परंतु आता मात्र स्त्रिया हे निर्णय घेऊ लागल्या होत्या. महिलांसाठी स्वयं सहाय्यता व्हावी म्हणून त्याच्यापुढे दूध डेअरीचे प्रयोजन मांडले जाते. पूर्वी स्त्रियांचा एक-दोन म्हैशी सांभाळण्यात पूर्ण दिवस जायचा. राजेंद्रसिंह व 'तरुण भारत संघ' भरपूर दूध देणाऱ्या गाई, म्हशी, चारा यासाठी कर्ज देऊ करतात. जे दुधाचे पैसे मिळणार त्यातून कर्ज फिटले जाईल, त्या कर्जाला व्याजही नव्हते. दूध डेअरी चालवण्यासाठी स्त्रियांच्याच ताब्यात दिली जाई. महिला हिमतीने दूध डेअरी चालवतात. रामप्यारी म्हणते, ''तुम्ही कर्ज देणार, कष्ट आम्ही करणार, कर्ज फेडणारही आम्हीच. मग नवऱ्याला विचारून तरी काय उपयोग?''[२९] या महिला स्वत: निर्णय घेत होत्या, खंबीर व जागृत होत. येणाऱ्या पैशातून आपण काय करणार याची स्वप्ने पाहतात.

दूध डेअरीच्या कामात या स्त्रियांना कोणतीच आर्थिक अडचण येत नव्हती. तेथील स्त्रिया मुला-मुलींना 'तरुण भारत संघा'च्या शाळेत घालतात. या स्त्रिया अशिक्षित होत्या परंतु जागृत होत्या. पूर्वी कजौडीला वाटत होते तिच्या बहिणीच्या गावात शाळा असल्याने तिची मुले शाळा शिकणार व आपली मुले आपल्यासारखीच अडाणी राहणार. शाळा शिकल्याने माणसे चांगला विचार करतात. त्यांना नोकरीही चांगली मिळते. कजौडी अशिक्षित असूनही तिला हे कळते. अशाप्रकारे या महिलांच्या छोट्या छोट्या गोष्टीतूनही आपले हित कशात आहे हे त्यांना समजंत जाते.

राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाखाली सर्व महिला मिळून दुधाच्या मिळणाऱ्या पैशातून बचत गटाची स्थापना करतात. ज्यांना गरज आहे त्यांना कमी व्याजात पैसे देतात, ज्यांचे पैसे जास्त जमा झाले असतील त्यांना जादा व्याज मिळे. त्या डेअरीचे नाव सर्व महिलांच्या

विचाराने 'गोकुळ' ठेवले जाते. त्या दुधाचा योग्य भाव दररोज स्त्रियांना मिळत असे. यामुळे त्या आनंदून जात होत्या. अशिक्षित स्त्रियांच्या ठिकाणी नवीन विश्वास निर्माण झाला होता. हे 'जोहड' या कादंबरीत पहावयास मिळते.

राजेंद्रसिंह मेंढीच्या केसापासून कंबळी तयार करायला, सतरंज्या, विणण्यासाठी तेथील महिलांना मार्गदर्शक करण्यासाठी मार्गदर्शकही नेमतात. तेथील आदिवासी स्त्रियांना मार्गदर्शन करतात. महिलांना कामही मिळते. विणलेल्या कंबळी, सतरंज्या बाजारपेठेत जाऊन आर्थिक मदतही मिळते.

अशाप्रकारे स्त्रिया जागृत होतात. आपले हित कशात आहे हे त्यांना कळायला लागते. 'अरवली चेतना पदयात्रे'त पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही सहभागी होतात. या सभेत एक महिला म्हणते, ''अरवली वाचविण्यासाठी तुम्ही सांगाल ते काम आम्ही करू. आमचे जीवन जसे बरबाद झाले आहे, तसे दुसऱ्या मुलींचे होऊ नये असे वाटते. काय सांगू ! माझ्यासारख्या कितीतरी जणींचे पती खाणीत काम केल्याने रोग लागून मेले... आम्हाला शरीर विकणं भाग पडतंय. आमची दखल घ्या. माझ्यासारख्या कित्येक जणी आहेत. आम्हाला काम द्या. मी हात जोडून विनंती करते.''[३०] अशाप्रकारे अनेक स्त्रिया आंदोलनात सहभाग घेतात.

शरीराने थकलेली, परंतु मनाने खंबीर असणारी दडकीमाई ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला उभी राहते. तरीही ती डगमगत नाही. गावात रस्ता करावा, शाळा काढाव्यात, विधवा स्त्रियांना मदत मिळवून द्यावी, अशी तिची स्वप्ने असतात. ती स्वत: पुढाकार घेऊन गावची पाणी समस्या मिटवण्यासाठी जोहड बांधण्यासाठी राजेंद्रसिंहांना स्वत: जाऊन भेटते. स्त्री असूनही स्वत: कटाक्षाने लक्ष देऊन जोहडचे काम पूर्ण करून घेते. हे एका जागृत स्त्रीचे उदाहरण म्हणता येईल.

जंबुरी, कजौडी, झुमा, दडकीमाई, रामप्यारी या सारख्या अनेक महिलांना पाण्यासाठी वणवण करत फिरावे लागत होते. पुरुष परगावी रोजगारासाठी गेल्याने लहान मुलांची, वृद्ध सासू-सासऱ्यांची सेवा करावी लागत होती. अंग झाकण्यासाठी ठिगळे लावून

वर्षानुवर्षे तीच कपडे वापरली जात होती. खाण्या-पिण्याची, कपड्यालत्त्यांची, दागदागिन्यांची हौसमौज या स्त्रियांना माहीतच नव्हती. राजेंद्रसिंहांच्या आगमनाने या स्त्रियांच्या जीवनात परिवर्तन होते. स्त्रिया संकटांनी ग्रासलेल्या दिसत नव्हत्या. राजेंद्रसिंहांच्या अनेक योजनांना प्रतिसाद देऊन दहा-बारा वर्षांत त्यांच्या जीवनशैलीत बरीच प्रगती झाली होती. नवीन घरे, महिला संघटना, पर्यावरण रक्षण, ग्रामसभेत सहभाग, जंगली जीव व जंगल संरक्षण, शिक्षक प्रशिक्षण, आरोग्य प्रशिक्षण, 'तरुण भारत संघा'च्या शाळा, दूध डेअऱ्या अशा अनेक कार्यात महिला पुढे होत्या. त्यांना संसाराची चिंता नव्हती. कोणाची भीतीही नव्हती. राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाने जागृत होऊन त्या स्वावलंबी होत होत्या.

'जोहड' या कादंबरीत स्त्रियांमध्ये झालेला आमूलाग्र बदल जाणवतो. या स्त्रिया स्वत:चे निर्णय स्वत: घ्यायला समर्थ ठरलेल्या दिसतात. या स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. सर्व उपक्रमात सक्रीय सहभागी होतात. अशा या खंबीर, दृढनिश्चयी स्त्रियांचे चित्रण जोहडमध्ये येते. 'स्त्री जागृती' हे आशयसूत्र या कादंबरीत विशेषत्वाने दिसून येते.

**६. स्वावलंबन :**

गरीब लोकांच्या परिस्थितीचा व असहाय्यतेचा फायदा बेकायदेशीर काम करणारे लोक घेत असत. त्यांच्यावर ते कडक बंधनेही लादत. या आदिवासी लोकांना शिक्षणाचा गंधही नव्हता. स्वच्छता, टापटीप, आरोग्य या विषयी त्यांना काहीही माहिती नव्हती. अनेक दिवस विनाआंघोळीचे ते राहत. काही वेळा आंघोळ केलेले पाणी जनावरांना पाजले जात. दिवसभर कंबर मोडेपर्यंत काम करावे लागे. पोटाची आग शमविण्यासाठी या लोकांना पदोपदी तडजोड करावी लागे. अशा या लोकांच्या जीवनातील दु:ख, दारिद्र्य, वेदना, संघर्ष राजेंद्रसिंहांना पाहवत नाही त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी राजेंद्रसिंह अनेक योजना आखतात. स्वातंत्र्यापूर्वी या समाजाची जी अवस्था होती तिच स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही राहिली होती. पशुतुल्य पातळीवर असलेल्या आदिवासी लोकांना राजेंद्रसिंह गावकऱ्यांच्या सहकार्य करतात, अनेक कामामध्ये मार्गदर्शन करतात. दीन बांधवांना स्वावलंबी

बनविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतात. 'कोणत्याही प्रकारचा आधार घेऊन जगणारी माणसं ही आयुष्यभर परावलंबीच राहतात आणि अशांचा आधार गेला की, त्यांची स्थिती अतिशय दयनीय होत असते.'[३१] म्हणूनच राजेंद्रसिंह आदिवासींना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न करतात.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ज्या भागात वीज, रस्ते, दवाखाने, मुला-मुलींना शिक्षण नाही त्या भागात जाऊन त्यांची स्थिती सुधारुन, त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी राजेंद्रसिंहाना पत्नी मीनाची साथ हवी असते.परंतु राजेंद्रसिंह नोकरी सोडणार हे तिला मान्य नसल्याने ती त्यांना साथ देत नाही. मित्रही त्यांना सहकार्य करण्यास नकार देतात.

राजेंद्रसिंह एकटेच जोहड खणण्यास सुरुवात करतात. खचून न जाता, स्वावलंबी होतात एकटेच तहानभुकेची तमा न करता अविरतपणे जोहड खणत राहतात. हृदयात प्रचंड उर्मी, डोळ्यात स्वप्ने, बाहुत शक्ती आणि हृदयात मानवता हे सारे घेऊन त्यांना ध्येय गाठायचे होते.

झुमाचा नवरा माधो अपंग असल्याने तो झुमावरच अवलंबून असतो. उपचारामुळे त्याला नवीन जीवन मिळते. तो आपल्या दोन्ही पायाने बुटाच्या साह्याने चालू लागतो. हे सर्व प्रयत्न राजेंद्रसिंहांचे असतात. राजेंद्रसिंहच त्याला दवाखान्यात पाठवतात. झुमाच्या कष्टावर जगणारा माधो स्वावलंबी होतो.

अनेक वर्षांचा दुष्काळ 'जोहड'मुळे मिटतो. तीन-चार मनापेक्षा कमी बाजरी होणाऱ्या हरिरामच्या शेतात पाण्याच्या सोईमुळे चाळीस-चाळीस मन बाजरी पिकू लागते. हरिराम बाजरीचे पोते राजेंद्रसिंहांना द्यायला घेऊन येतो. एक वेळचे जेवायलाही न मिळणारे लोक स्वावलंबी होतात. स्वत:च्या शेतात कोणतेही पीक घेतात. राजेंद्रसिंह ते पोते नाकारतात. परंतु अपार प्रेमापोटी त्यांची बाजरीची भेट स्वीकारतात.

हरिरामचे कुटुंब स्वावलंबी होते. शेती, करुन म्हैसी पाळून आता घरात धनधान्याची दुधा-तुपाची कमतरता संपते. लोकांचे शापित जीवन पाण्याच्या आगमनाने समृद्ध होते. 'इथली माणसं आता खऱ्या अर्थानं जगताहेत आणि हे सारं आपल्या हाताने आपणच

केलंय, याचा रास्त अभिमान व आनंद या लोकांना आहे.'[३२] ही माणसं स्वावलंबी झालेली दिसतात.

पूर्वी अनेक तरुण कामासाठी शहरात जात असत. परंतु राजेंद्रसिंहांच्या आगमनाने गावकऱ्यांचे काही दिवसातच गावाकडे आगमन होते. जिद्दीने, अपार कष्टाने व असीम ध्येयाने तेथील लोकांचे संपूर्ण जीवन बदलून टाकतात. अनेक जोहडची निर्मिती करतात, परगावी कामासाठी गेलेले तरुण आपल्या शेतात रमतात. शेतात ज्वारी, बाजरी, मुळा, गहू, बटाटा, मटार, कोबी, घेवडा या भाज्यांची लागवड करतात. तेथील निळासावळा जलाशय पाहून लोक आनंदून जातात. शेतात पीक भरपूर पिकत असल्याने आर्थिक किंवा अन्नधान्याची टंचाई भासत नाही. सर्वजण स्वावलंबी बनतात. शहरात मजुरी करण्यासाठी गेलेले लोक आपल्या शेतात काम करू लागतात. पाण्याची मुबलकता झाल्यामुळे शेतातही धनधान्य जास्त पिकू लागते. त्यामुळे गावात ग्रामकोष व्हायला लागतो. शेतात शेतकरी दोन-दोन पिके घेऊ लागतात. शेतकरीही स्वावलंबी होतात.

कादंबरीच्या सुरुवातीला जीर्ण व कृश अवस्थेत भेटलेली कजौडी व इतर महिला स्वावलंबी होतात. राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाखाली या स्त्रिया गालिचे विणण्याचे केंद्र सुरू करतात. टिकाऊ, आकर्षक किंमतीने कमी असे गालिचे बनवतात. स्वत: कष्ट करून जीवन जगू लागतात. त्यांच्या हातात, बटव्यात नेहमी लक्ष्मी खेळते. स्वत:चा उदरनिर्वाह स्वत:च्या पैशावर करू लागतात. जोहडच्या निर्मितीमुळे व अनेक प्रकारच्या सुधारणांमुळे तेथील लोक स्वावलंबी होतात.

सारांश, जोहडमुळे पाण्याची टंचाई दूर झाल्याने तडजोड न करता, स्वत:च्या मनाप्रमाणे लोक जगू लागतात, स्वावलंबी होतात. कोन काय म्हणेल याची पर्वा न करता 'स्व' ला जपतात, मुक्त जीवन जगू लागतात. त्यामुळे त्यांच्या कादंबरीतील 'स्वावलंबन' हे आशयसूत्र महत्त्वाचे वाटते.

## ७. एकजूट :

माणूस हा समाजाशिवाय राहू शकत नाही. अनेक माणसे एकत्र आल्यानंतर समाज तयार होतो. माणूस हा समाजशील प्राणी असल्याने माणसांच्या सहवासाशिवाय तो जिवंत राहू शकत नाही. अनेक व्यक्तींचे मिळून एक कुटुंब बनते आणि अशा अनेक कुटुंबांचा एक समाज बनतो. समाजात आणि कुटुंबात वावरणाऱ्या माणसांच्या सहकार्याने, एकजुटीने अनेक अशक्य कामे शक्य होतात. कामाला दिशा मिळते. पाणीप्रश्नाची सोडवणूक तसेच इतर अनेक प्रश्नांशी एकीने केलेला तीव्र संघर्ष 'जोहड'मध्ये दिसून येतो.

'केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे' या उक्तीनुसार माणसे कामाला सुरुवात करतात. सत्येंद्र, नरेंद्र, हनुमान, केदार या साथीदारांच्या सहकार्याने कामास आरंभ होतो. उदासीन, वाळवंटी, शापीत असणाऱ्या भागात जाऊन त्या लोकांच्या सुधारणेसाठी आपले जीवन सार्थकी लावतात. कजौडी, जंबुरी त्यांना कामात साथ देतात. या स्त्रिया मजुरीही नाकारतात. हळूहळू दुसऱ्या स्त्रियाही जोहडच्या कामाला येतात. परगावी कामासाठी गेलेले अनेकजण परत येऊन जोहडच्या कामात मदत करतात. मित्र सोडून जातात. याचे राजेंद्रसिंहांना वाईट वाटते. परंतु गावकरी साथीला येतात. त्यामुळे ते गावकऱ्यांच्या साह्याने न थांबता काम सुरु ठेवतात. एकमेकांच्या साथीने जोहड पूर्ण होतात. शेजारच्या गावचे लोक जोहड पहायला येतात. आमच्या गावातही जोहड बांधायला या म्हणून विनंती करतात. परगावी जाऊन राजेंद्रसिंह मार्गदर्शन करतात. एकमेकांच्या साथीने जोहड पूर्ण होतात.

'गोपालपुरा', हे अलवर या जिल्ह्यातील किशोरी पासून अगदी थोड्या अंतरावर असणारे एक छोटेसे गाव! या गावात बदरी, नानगराम, मांगू, जगदीश, रामदयाळ, भगवान हे लोक भिन्न-भिन्न धर्मातील स्पृश्य-अस्पृश्य जातीतील असूनही एकत्र येऊन सर्व प्रश्नांवर चर्चा करतात. आपआपसात अनेक प्रश्न सोडवतात. मांगू पटेल हा वृद्ध, अनुभवी असल्याने तो गावकऱ्यांना मार्गदर्शन करतो. बेकारी, रोगराई या व अशा अनेक प्रश्नांना सर्वजण मिळून तोंड देऊ शकतो, असा विश्वास त्यांच्या ठिकाणी निर्माण होतो.

राजेंद्रसिंहांच्या 'तरुण भारत संघा'ला रोज नवीन कार्यकर्ते मिळतात. 'तरुण भारत संघा'च्या कार्यकर्त्यांचा आवाका वाढतच जातो. या कार्यकर्त्यांना भीषण संकटाला सामोरे जावे लागते. अलवर, भरतपूर शहरात तसेच शेरपुरा, मिर्जापुर, गुडरायपूर, सालकर, बिरानी, गंगापुरी, झाडका, बांधोली अशा तीन साडेतीनशे गावात पुराच्या पाण्याने थैमान माजवलेले असते. या स्थितीत राजेंद्रसिंह व 'तरुण भारत संघ' क्षणभरही विसावा न घेता, स्वतःच्या जिवाची पर्वा न करता या प्राणघातक, महाकाय संकटातून लोकांना वाचवण्याचा प्रयत्न गावागावातून करतात. स्वतःच्या जिवाचा विचार न करता खवळलेल्या पाण्यात उड्या मारून लोकांना वाचवतात. पूरग्रस्तांना अन्न, वस्त्र, औषधे, निवारा उपलब्ध होण्यासाठी सरकारी मदतही चालू असते व 'तरूण भारत संघ' ही या सेवा पुरवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतो. सर्व कार्यकर्ते एकसंघ होऊन उद्ध्वस्त झालेले संसार पुन्हा उभारण्यासाठी अनेक वस्तूंचे वाटप करतात. भविष्यात पुन्हा अशी वेळ येऊ नये म्हणून सर्व गावकऱ्यांना बोलवून चर्चासत्राचे आयोजन करतात. राजेंद्रसिंह व गावकरी आपआपले विचार मांडतात.

दुरावलेले राजेंद्रसिंहांचे जीवलग मित्र चूक लक्षात आल्यानंतर राजेंद्रसिंहांना साथ द्यायला येतात. त्यांची पत्नी मीनाही आपल्या नवऱ्याच्या कार्याने आनंदी होऊन त्यांना मदत करायला परतते. आपल्या नवऱ्याच्या कार्याचा तिला आदर, अभिमान वाटतो. या सर्वांची साथ मिळाल्याने राजेंद्रसिंह आनंदून जातात.

भिकमपुराच्या 'तरुण भारत संघा'च्या आश्रमात अमावस्येला व पौर्णिमेला सर्वजण एकत्र येऊन एकमेकांच्या विचाराने अनेक प्रश्न सोडवतात. पुरुषांबरोबर स्त्रियाही निर्णय घेतात. धान्यांचा पुरवठा योग्यप्रकारे व्हावा, यासाठी सर्वांच्या विचाराने धान्य साठवण्यासाठी पिंप मागवले जातात. महागाई वाढेल तेव्हा पूर्वीच्याच भावाने ते धान्य दिले जावे यासाठी प्रयत्न केले जातात. देशी बियाणांची काळजी कशी घ्यावी, शेतीसाठी उपयुक्त शेणखत कसे तयार करावे याविषयी सर्व गावकरी मिळून विचारविनिमय करतात.

राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाखाली खाणमालकांविरूद्ध कामगारांची एकजूट होते. खाणमालकाचा रोष गगनाला भिडतो. ते राजेंद्रसिंहांवर केस करतात. प्राणघातक हल्लाही

करतात. परंतु गावकऱ्यांची साथ व एकजूट असल्याने खाणमालकांची डाळ शिजत नाही. कलेक्टरचीही साथ राजेंद्रसिंहांना मिळते.

नि:स्वार्थपणे साह्य करणारे भावता कोल्यालाचे लोक. या लोकांना कोणताच फायदा होत नसताना, हमीरपूरच्या लोकांना जोहड बांधण्यास मदत करतात. अनेक जोहडमुळे मृत अरवरी नदीला जीवनदान मिळते. अरवरी पुन्हा वाहू लागते. काही दिवसातच या अरवरीच्या पात्रात मासे पकडण्यासाठी ठेकेदारास ठेका दिला जातो. हे गावकऱ्यांना पटत नाही. गावातील स्त्री-पुरुष लहानथोर सर्वजण एक होऊन या विरूद्ध आवाज उठवतात.

वृक्षाची बेकायदेशीर होणारी तोड पाहून राजेंद्रसिंह व गावकरी, 'तरुण भारत संघ' एकत्र येऊन अरवली चेतना पदयात्रेचे आयोजन करण्यात. या पदयात्रेत काढण्यात येते. राजस्थानातून टोक, सवाई माधोपूर, कोटा, झुंझनू, झालावाड, दौसा येथून पदयात्रा काढण्यात येते जयपूर व अवलरमध्ये मुख्य दलात सहभागी होतात. हरियाणातून खोरी, भिवानी, दौगडा, महेंद्रगढ, गुडगाव, रोहतक, मंडाविली इथूनही पदयात्रा; यात शेकडो विद्यार्थी, अनेक अधिकारी सामील होतात. गुजरातमधील हिंमतनगर येथून एकाचवेळी चौदा गावांतून शुभारंभ होऊन माणसांनी ओसंडून गेलेल्या जंतरमंतरच्या भव्य मैदानात सांगता होते. या पदयात्रेत अशा अनेक गावचे लोक एकत्र येऊन एकजुटीने जंगल रक्षणाचे मार्गदर्शन करतात.

'तरुण भारत संघा'च्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांच्यात एकजूट होऊन पर्यावरणाची हानी होत असल्याने सातसितारा हॉटेल बंद पाडण्यासाठी हॉटेलसमोर राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाने गावकरी एकीने रामपाठाचे आयोजन करतात. या रामपाठामुळे गावकऱ्यांच्या 'श्रद्धेनं, निष्ठेनं कमकुवत मनाला आगळेच सामर्थ्य येत असतं.'[३३] रामपाठाला स्र्वजण एकत्र आल्यामुळे गावकऱ्यांमधील दुरावा कमी होतो. भ्रष्ट लोकही या रामपाठाला येऊन बसतात. एकमेकांच्यातील राग, रोष यांचा लोप होऊन सर्वांच्यामध्ये एकमत व एकी होते.

राजेंद्रसिंहांचे सहकार्य आणि गावकऱ्यांची एकजूट, श्रम यामुळे अनेकांचे संसार सुखाचे होतात. रखरखीत, उजाड भूमीचे अनेकांच्या हातांच्या श्रमांनी नंदनवन होते. जे

स्वप्नातही पाहू शकत नव्हते ते साक्षात दिसते. एकजुटीने हे शक्य होते. एका व्यक्तिला एवढा बदल करणे कधीच शक्य झाले नसते. परंतु एकीनेच हे साध्य होते.

अशाप्रकारे एकीचे बळ हे नेहमी मोठे असते. राजेंद्रसिंह सर्व गावकऱ्यांना संघटीत करून अनेककामे पूर्णत्वास नेतात. दुर्जनांचेही परिवर्तन सज्जनामध्ये करतात. लोकांच्यामध्ये एकजूट तयार करून अनेक प्रश्न सोडवतात. अनेक जोहड बांधतात. गैरकृत्य करणाऱ्या लोकांविरूद्ध हे गावकरी संघटित होऊन त्यास प्रतिकार करतात. अशा 'एकजूट' या आशयसूत्रांचे दर्शन 'जोहड'मध्ये घडते.

८. **कष्टाचे मूल्य :**

उदात्त ध्येयाने प्रेरित होऊन तहानभूकेची पर्वा न करता, ऊन-थंडी विसरून मृतप्राय भूमीला, तेथील माणसांच्या मेलेल्या मनाला राजेंद्रसिंहांनी संजीवनी दिली. या तरुणाने संघर्ष करुन तेथील माणसांची नरकयातनेतून, उपासमारीतून, दुष्काळातून सुटका केली. त्यांच्या सामाजिक कार्याची आणि कष्टाची व्याप्ती विशाल आहे.

अन्नदाता, प्राणदाता, जीवनदाता, रक्षणकर्ता, भैय्या अशा अनेक उपाध्या असणाऱ्या राजेंद्रसिंहांनी असामान्य कार्य करून सर्वांना अंतर्मुख केले. त्यांना मिळालेले अनेक पुरस्कार, लोकांनी त्यांच्यावर दाखविलेला विश्वास आणि छोटे छोटे जोहड बांधून हजारो एकर ओसाड, नापिक झालेली जमीन हिरवीगार होते. हे त्यांच्या कष्टाचे मूल्य म्हणता येईल. राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाखाली हमीरपूरच्या गावकऱ्यांनी मृत अरवरी नदीला जीवनदान दिले. त्यांच्या कष्टाचा मोबदला म्हणून राष्ट्रपती माननीय के. आर. नारायणन यांच्या हस्ते ''डाऊन टू अर्थ'' हा पुरस्कार गावकऱ्यांना मिळणार होता. कष्टाने बांधलेले जोहड जेव्हा पाण्याने भरतात, तेव्हा शेती हिरवीगार होते, कशाचीही टंचाई भासत नाही, तेव्हा त्यांना आपल्या कष्टांचे मूल्य मिळाल्यासारखे वाटते.

मुलगी रेणूचे आपल्या वडिलांवर अतिशय प्रेम असते. त्यांनी पूर्वी भोगलेल्या अनेक यातना, वेदना, आपल्या कष्टाने अनेकांचे सोडवलेले प्रश्न याचा रेणूला अभिमान वाटतो. राजेंद्रसिंहांच्या अपार कष्टाची महती त्यांची पत्नी मीनालाही समजते. राजेंद्रसिंहांच्या या

कष्टाची अखंड धुरा रेणू कलेक्टर होऊन वाहू पाहते. तर मुलगा मौलिक इंजिनिअर होऊन पप्पांना मदत करू इच्छितो. अशाप्रकारे कुटुंबातील व्यक्ती राजेंद्रसिंहांच्या कष्टांवर प्रेरित होऊन त्यांना मदत करू इच्छित होत्या. राजेंद्रसिंहाना कुणाचीही साथ नसताना एकटे झगडले त्या कष्टाचे हे मूल्य मिळते.

राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाने अनेक जोहड बांधले गेले. गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य त्यांना लाभले. 'ओस पडलेल्या विहिरींना गंगा यावी तसे पाणी आले होते.'[३४] हा सर्व परिणाम होता तो राजेंद्रसिंहांनी गावकऱ्यांच्यात निर्माण केलेल्या एकजुटीचा. अनेक जोहड खणल्यामुळे अनेक नद्या वाहू लागतात. त्यांना नवीन जीवन मिळते. यामुळे पाण्याची टंचाईग्रस्त असणारी गावे पाण्याच्या टंचाईपासून मुक्त होतात. लोक आनंदाने राहू लागतात. शेतात मुबलक पिक मिळू लागते. तेथील गावकरी हरिरामजी त्यांना बाजरी भेट देतात. त्यांनी केलेल्या कष्टाचे हे मूल्य म्हणता येईल.

राजेंद्रसिंहांच्या कष्टाने, स्वभावाने, गुणाने राजेंद्रसिंहांसाठी प्राण पणाला लावणाऱ्या हजारो व्यक्ती तयार होतात. मदतीलाही अनेक संस्था येतात. या सर्वांच्या सहकार्यातूनच ते अनेक प्रसंग सावरून नेतात. अनेकदा विश्वासघातकी लोक भेटतात. मांगू पटेलसारखी प्रेमाने जवळ करणारे, प्रेरणा देणारे लोकही भेटतात. अनेक बऱ्या-वाईट प्रसंगात गावकरी सहकार्य करतात. सर्वांनी मिळून केलेल्या कष्टांचा, कार्यसाफल्याचा आनंद अविस्मरणीय असतो. ध्येय गाठण्यासाठी त्यांनी जे कष्ट केले ते मिळालेही आणि ते राजेंद्रसिंहांना गावकऱ्यांच्या तोंडावर दिसत होते. आपण केलेल्या कष्टांचा मोबदला हा गावकऱ्यांच्या हसऱ्या चेहऱ्याकडे पाहून त्यांना मिळत होता. त्यांचे हसरे चेहरे पाहून राजेंद्रसिंहांना वाटत होते, 'मिळालेल्या अनेक पुरस्कारांचा आनंद इतका मोठा नव्हता की, ज्यापुढे आपल्या कार्यसाफल्याचा आनंद कमी वाटावा.'[३५]

राजेंद्रसिंहांच्या अपार कष्टामुळे 'जोहड'ला 'राजेंद्रसागर' असे नाव द्यावे असे गावकऱ्यांचे म्हणणे असते. राजेंद्रसिंह मात्र याला नकार देतात. त्यांनी केलेले कार्य पहायला देशातील, विदेशातील, स्वयंसेवी संस्था, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी मंडळी

येतात. पूर्वी ज्या अधिकाऱ्यांनी केसेस केल्या होत्या ते अधिकारीही हे कार्य पहायला, मार्गदर्शन व भेटी द्यायला येतात. राजेंद्रसिंहांना सर्वप्रथम मदत करणारी 'कजौडी' तिचा संसार पूर्वीच्या कष्टाने फुलला होता. त्या वस्तीवरील सर्वच घरे पूर्वीची राहिली नव्हती. 'तरुण भारत संघा'च्या व गावकऱ्यांच्या कष्टाने गावकऱ्यांचा संसार बहरला होता. पूर्वी थेंबभर पाण्यासाठी वणवण भटकावे लागत होते. हे बदल झाले होते. परंतु पूर्वीच्या कष्टाचे, परिश्रमाचेच हे मूल्य म्हणता येईल.

राजेंद्रसिंहांनी केलेल्या अपार कष्टामुळे कजौडी व इतर लोकांचे जीवन बदलून जाते. त्यांच्या आशीर्वादाशिवाय आपल्या मुलांचे व मुलींचे लग्न करायचे नाही असा निश्चय कजौडी करते. त्यासाठी मुहूर्त बदलायलाही तयार असते. राजेंद्रसिंह या गावकऱ्यांच्या आदरापोटी वेळात वेळ काढून जायला तयार होतात. खूप कष्ट करणाऱ्या या स्त्रिया लग्नाच्या नाच-गाण्यात दंग होऊन जातात. कजौडी राजेंद्रसिंहांवर रचलेले गाणे म्हणावयास सांगते. या गाण्यातून राजेंद्रभैय्यावर असणारी अपार माया प्रत्ययाला येते. 'कित्येक पुरस्कारापेक्षा त्यांच्या अकृत्रिम प्रेमाचा हा पुरस्कार आपल्यासाठी अधिक मोलाचा आहे.'[३६] असे राजेंद्रसिंहांना वाटते.

राजेंद्रसिंहांनी बांधलेल्या जोहडच्या कार्यावर प्रेरित होऊन महाराजा गजसिंह स्वत:च्या वाढदिवसादिवशी त्यांचा सिरपावा देऊन सत्कार करण्याचे ठरवतात. गळ्यात पुष्पहार घालून स्वागत करतात. हत्तीच्या अंबारीत बसवून मिरवणूक काढली जाते. दोन्ही बाजूच्या इमारतीतून फुलांचा वर्षाव होतो. आसनावर राजेंद्रसिंह स्थानापन्न होतात. वाढदिवसानिमित्त काही कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. राजेंद्रसिंहांना मानाचे महावस्त्र, सिरपावा व मानपत्र देऊन त्यांचा सत्कार होतो. राजेंद्रसिंहांच्या मस्तकी स्वहस्ते साफा बांधतात, मानपत्र देऊन, नक्षीकाम केलेल सिरपावा हे महावस्त्र राजेंद्रसिंहांना देतात. या महान पुरुषाला बोलवावे व त्याचा सत्कार करावा असे त्यांना मनोमन वाटत होते. ते या शुभदिनी शक्य झाले होते. या महान हृदयाला महाराज गजसिंह स्नेहभराने आलिंगन देतात. राजेंद्रसिंहांनी केलेल्या कष्टांचे मूल्य अशा अनेक पद्धतीने मिळते.

अशाप्रकारे 'जोहड' या कादंबरीमध्ये 'कष्टाचे मूल्य' दिसून येते. अनेक जोहड बांधले गेल्यामुळे पाण्याची टंचाई मिटते. त्याचप्रमाणे शेती हिरवीगार होते. अन्नधान्याची समस्या नाहीशी होते. पूर्वी पुरेसे जेवायला मिळत नव्हते, त्या लोकांचे संसार आता सुखाचे झाले होते. धान्य विकून इतर आवश्यक साधने घेऊ लागले होते. राजेंद्रसिंहांच्या कार्याने तो भाग समृद्ध होतो. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून कष्ट सफल झाल्यासारखे होते. लोकांचे कष्ट व त्या कष्टांनी मिळालेले मूल्य 'जोहड' या कादंबरीमध्ये उठून दिसते.

**९. जगण्याचा लढा :**

या कादंबरीत प्रथमपासूनच पहावयास मिळतो तो प्रत्येक व्यक्तीने आपले जीवन जगत असताना दिलेला संघर्ष. प्रारंभीच कजौडीची हालत पाहून तिचा नवरा किशन म्हणतो, ''अरी मुन्नी की माँ, तू तर अशी झाली आहेस की फुंकर मारली तर उडून जाशील बघ.''[३७] जगण्याचा संघर्ष करताना गांजलेली अशक्त हाडांचा सापळा असणारी कजौडी. या कजौडीप्रमाणेच अनेक स्त्रियांना व पुरुषांना प्रत्येक दिवशी नवीन प्रश्नांना सामारे जात जगावे लागते. गावातील तरुण पोट भरण्यासाठी परगावी जातात.

महात्मा गांधीजींनी पाहिलेले ग्रामीण विकासाचे स्वप्न, बुद्धांच्या डोळ्यात असणारी मानवतेविषयीची करुणा, तर महावीर यांच्या ठिकाणी असणारी प्राणिमात्राबद्दलची दया भावना, जयप्रकाशजींच्या ठिकाणी असणारी ध्येयनिष्ठा उराशी घेऊन नवीन पिढीला नवा प्रकाश मार्ग राजेंद्रसिंह दाखवू पहात होते. तेथील उजाड भागासाठी, लोकांसाठी काहीतरी करावे असे त्यांना नेहमी वाटायचे. 'किंकर्तव्यपणे किंवा निर्लज्जपणे असेच अलिप्त राहिले तर आपलीच सद्सदविवेकबुद्धी आपल्याला क्षमा करील का?'[३८] असा प्रश्न त्यांना पडतो. या प्रश्नांनी ते झुरत बसत. यातून काही तरी मार्ग काढावा असे त्यांना वाटे.

राजस्थानमध्ये प्रकल्प अधिकारी म्हणून ते काम करत असताना त्यांना 'तेथील गावागावांवर निसर्गाची झालेली अवकृपा, निष्क्रिय झालेली माणसं, लहान खेड्यांची, वस्त्यावस्त्यातून झालेली वाताहत, तिथल्या तरुणांनी रोजीरोटीसाठी शहराकडे घेतलेली धाव, आटलेल्या नद्या, विहिरी, नजर पोहोचेल तिथवर दिसणारी भेसूर, बंजर जमीन आणि

त्याहीपेक्षा अधिक बंजर झालेली तिथल्या रहिवाशांची मनं! पाण्याच्या थेंबाथेंबासाठी आसुसलेली माती आणि माणसं हे सारं दृश्य राजेंद्रला अस्वस्थ करीत होतं, छळत होतं.'[३९] इथल्या माणसांच्या नसानसातून जिवंत रक्ताऐवजी जणू काळोखच वाहतोय असे वाटायचे. रोगराई, भूक अज्ञान या सर्व समस्येविरूद्ध लढा देण्याचा ते विचार करतात.

तेथील लोकांना क्षणाक्षणाला संघर्ष करावा लागत होता. कजौडीचा मुलगा आजारी पडतो. त्याला कॉलरा झालेला असतो. ताबडतोब औषध दिले नाही तर त्याची जगण्याची शक्यता कमी असते. शेजारच्या झोपडीतील रामीचाही मुलगा कॉलरानेच गेलेला होता. कजौडीच्या मुलाला आपल्या जवळील औषधे देऊन राजेंद्रसिंह बरे करतात.

पाणीटंचाईमुळे उद्भवणारे अनेक प्रश्न आहेत. तसेच पुराच्या समस्येनेही अनेक प्रश्न उद्भवतात. साबी व रुपारेल नद्यांना येऊन मिळणारे चुडसिद्धसारखे नाले यांना आलेल्या पुरात गुरेढोरे, घर, घरातील सामान आयुष्यभर जिवापाड जपलेला संसार, गरजेच्या वस्तू याचे काहीच मोल राहत नाही. प्राण वाचविण्यासाठी टाहो फोडणारी, आकांताने हाक मारणारी माणसे, हे पाणी सर्व गिळून टाकतेय की काय असे वाटते. राजेंद्रसिंह व 'तरुण भारत संघा'चे कार्यकर्ते स्वत:च्या जिवाची पर्वा न करता या महाभयावह प्रसंगातून वाचवण्याचा प्रयत्न करतात. पूरग्रस्तांची संख्या अफाट असल्याने सर्वांच्या गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत.

भरतपूर, अलवर, जालाको, धोकाका, दाईका, शेरपूरी, सहयोगनगर, हनुमाननगर अशा अनेक शहरात, गावात पुराने हाहाकार माजवलेला असतो. दहा-बारा दिवसांनी पूर ओसरतो. वीज पुरवठा, पाणीपुरवठा, वाहतूक, रस्ते वाहतूक सर्व विस्कळीत होते. पूर ओसरल्यानंतरची स्थिती फारच भयावह असते. पिकांची झालेली नासाडी, वाहून गेलेल्या झोपड्या, मातीने मुजलेल्या विहिरी, मृत पशूंचे-प्राण्यांचे सडलेल्या देहांची दुर्गंधी पसरलेली पहावयास मिळते. नवीन रोगांना आमंत्रण मिळते. मलेरिया, ताप, कॉलरा यासारखे रोग हवेसारखे पसरतात. या प्रसंगाने हताश झालेले लोक पुन्हा जगण्यासाठी लढा देण्यास सज्ज होतात.

राजेंद्रसिंहांना सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी आदिवासींचे जीवन सुसह्य व्हावे यासाठी समाजाशी संघर्ष करावा लागतो. त्यांच्यावर प्राणघातक हल्ल्याचे अनेक कट रचले जातात. ज्यांच्यासाठी ते जगत होते ते लोक आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या जीवनदात्या भैय्यांना वाचवतात. दुष्ट प्रवृत्तीच्या खाणमालकांच्या नजरेत ते खूपते. झुमास पैसे देऊन अनैतिक संबंध असल्याची खोटी साक्ष देण्यास तिला तयार करतात. हा प्रयत्नही निष्फळ ठरतो. राजेंद्रसिंह म्हणतात, "आपल्या अस्तित्वासाठी द्याव्या लागणाऱ्या लढ्याची ही सुरुवात आहे. संघर्षाची कसोटी आहे. आपण आपले काम निष्ठेने करू या."[४०]

राजेंद्रसिंहांनी डाकू नादानसिंहांचा कट्टर शत्रू असणाऱ्या डाकू मानसिंग यांच्या हद्दीत जोहड बांधल्याबद्दल राजेंद्रसिंहांच्या कार्यकर्त्यांना पळवून नेले होते. राजेंद्रसिंह नादानसिंहाला जोहड बांधून देण्यास तयार होतात. त्याच्या परिस्थितीने त्याला डाकू बनविलेले असते. तो राजेंद्रसिंहांना सांगतो, "तुला काय वाटतं? आम्ही सुखासुखी, हौस म्हणून दरोडेखोर झालोत ? ती आमची करमकहाणीच आहे. मी शेतकऱ्याचा मुलगा. शेतात राबणारा, घाम गाळून कष्ट करणारा माझा बाप. पण आमची थोडी जमीन होती. ती जमीनदाराने हडप केली. त्यामुळे आमच्याच शेतात मजुरी करायची वेळ आमच्यावर आली. एकवेळच्या रोटीसाठी आम्ही अन्याय सहन करीत होतो. पोटभर अन्न मिळायचं नाही तर देवावर हवाला ठेऊन जगत होतो. सहन करीत होतो. मात्र त्या जमीनदाराची पापी नजर माझ्या बहिणीवर गेली. मी स्वस्थ बसू शकलो नाही. माझं रक्त खवळून उठलं. जमीनदार मळ्यातून गावाकडे येत असताना त्याला अंधारात गाठलं आणि डंड्याने बडवलं, डोक्यावर घाव घातला. तो खाली पडला. तो मेला असे समजून या पहाडात पळून आलो. त्या हरामखोराला अद्दल घडवली याचं समाधान होतं. इथल्या टोळीत सामील झालो. नंतर कळले तो जमीनदार मेला नाही, वाचला. पण मी मात्र माझा गाव, घरदार, आईबाप सर्वांना गमावून बसलो. माझ्यासाठी ते संपले होते. परतून जायला वाट नव्हती."[४१] नादानसिंह अशाप्रकारे जीवनाशी संघर्ष करत होता. ही त्याची कहानी राजेंद्रसिंह ऐकून घेतात. त्याला सर्वसामान्य माणसाप्रमाणे जगण्यास सांगतात.

नादानसिंह व त्यांचे साथीदार राजेंद्रसिंहाच्या सांगण्यावरून हत्यारे खाली ठेवतात. डाकू नादानसिंहामुळे होणारा गावकऱ्यांचा त्रास ही कमी होतो. 'मृत्युपेक्षाही भयानक आणि नरकापेक्षाही वाईट असं आताचं जीवन कायमचं सोडून देण्याची इच्छा त्यांच्या मनात जागृत झाली.'[४२] त्यांना अंधारातून प्रकाशात आणले होते. त्याच्यावर झालेल्या केसही प्रयत्न करून मिटवतात. 'त्यांना कलंकित जीवनापासून परावृत्त करून, सामान्य जीवन जगण्यास प्रवृत्त करतात.' त्याच्या हातातील बंदुकीच्या ठिकाणी कुदळी येतात. नादानसिंगच्या जीवनाचा लढा संपून सर्वसामान्याप्रमाणे तो जीवन जगू पाहातो. राजेंद्रसिंहांचाही संघर्ष यशस्वी होतो.

'लावा का बास' हा जोहड जिल्ह्याच्या सिंचन खात्याची परवानगी घेऊनच बांधला होता. या जोहडवर हजारो कुटुंबे जगत होती. परंतु पाटबंधारा खात्याकडून नोटीस आली होती की, बंधारा धोकादायक आहे. परवानगीशिवाय बांधकाम केले आहे. तो पाडून टाकावा. एका अहिंसक लढ्याला प्रारंभ होतो. राजेंद्रसिंहांच्यावर यामुळे केसही केली जाते. ही बातमी लोकांमध्ये वाऱ्यासारखी पसरते. शेकडो स्त्री–पुरुष एकत्र येतात. ''आम्ही आमचे प्राण देऊ; पण हा जोहड बांध तोडू देणार नाही. या जोहडमुळेच आम्ही जगतो आहोत. याला आम्ही हातदेखील लावू देणार नाही. कुणी त्यासाठी पुढे आले तर आमच्या प्रेतावरूनच त्यांना जावे लागेल.''[४३] अशा घोषणा होतात. गावकरी या जोहडसाठी काहीही करायला तयार होतात. राजेंद्रसिंह सर्वांना शांत करून म्हणतात, ''याच 'लावा का बास' मी त्या जोहडवर एकटाच सात दिवस राहणार आहे. इथून हलणार नाही. इथेच मला अटक करा.''[४४]

राजेंद्रसिंह स्वत: या लोकाविरुद्ध लढण्यास तयार होतात. गावकऱ्यांच्या हक्कासाठी राजेंद्रसिंहांना एकट्यांना जोहडवर बसू देण्यास गावकरी तयार नसतात. परंतु राजेंद्रसिंहांच्या सांगण्यावरुन गावकरी जातात. 'ही प्रतिज्ञा एका कर्मयोग्याची असते, पानाफुलांना, झाडाझुडपांना, पशुपक्ष्यांना, पाण्याच्या थेंबाथेंबाला जपणाऱ्या एका निसर्गप्रेमीची होती. अन्यायाविरूद्ध संघर्ष करणाऱ्या निर्भय तरुण मनस्वी कार्यकर्त्याची होती.'[४५] केस पाठीमागे घेतली जाते. त्यांना अटक करण्याचे कोणाचेच धाडस होत नाही.

अशाप्रकारे गावकऱ्यांनी व राजेंद्रसिंहानी अनेक प्रश्नांना कशाप्रकारे लढा दिला हे या कादंबरीत दिसून येते. कशा परिस्थितीत तेथील लोक जीवन कंठीत असतात, अनेक त्रासाला कशाप्रकारे सामोरे जातात, क्षणाक्षणाला अनेक प्रश्न कसे उपस्थित होतात, त्यातून मार्ग काढत जीवन कसे जगतात याचे समर्पक चित्रण सुरेखा शहा यांनी केले आहे.

**समारोप :**

सुरेखा शहा यांची 'जोहड' ही कादंबरी आशयदृष्ट्या वेगळी आहे. पाणीप्रश्नाची यशस्वी सोडवणूक हे प्रमुख आशयसूत्र असून, जंगलरक्षणाची चळवळ, पर्यावरणे रक्षण, खाण कामगारांचा प्रश्न, स्त्री जागृती, कष्टाचे मूल्य, जगण्याचा लढा, एकजूट अशा इतरही आशयसूत्राभोवती कादंबरी गुंफली गेली आहे.

सुरेखा शहा यांनी जातीने तिथे हजर राहून, त्या भागांची पाहणी करून 'जोहड' या कादंबरीचे लेखन केले आहे. त्यामुळे तेथील वास्तवाचे अचूक निरीक्षण करून त्यांनी लिखाण केले आहे. राजस्थानच्या आदिवासी वातावरणाचा, तेथील लोकांच्या मानवी संवेदनांचा अचूक वेध घेतला आहे. आदिवासी जीवनशैलीचे निरीक्षण करून तो आशय आपल्या शब्दांत मांडला आहे.

पाण्याच्या समस्येमुळे होणारे राजस्थानमधील आदिवासी लोकांचे हाल व या समस्येवर 'जोहड' हा राजेंद्रसिंहांनी काढलेला मार्ग हा या कादंबरीचा गाभा आहे. राजेंद्रसिंह हे पाणी टंचाईपासून गाव मुक्त होण्यासाठी अनेक जोहड म्हणजेच तलाव बांधतात. त्यामुळे हळूहळू अनेक गाव पाणी टंचाईपासून मुक्त होतात. शेतातील उत्पन्नही वाढते. या प्रमाणे पाणीप्रश्नांची यशस्वी सोडवणूक केली जाते.

राजस्थानमधल्या आदिवासी लोकांना भेडसावणारे इतर अनेक प्रश्नांवर उपाय काढण्यासाठी राजेंद्रसिंह तेथील लोकांमध्ये एकजूट तयार करतात. स्वार्थी खाणमालकाविरूद्ध, बेकायदेशीर शिकार करणाऱ्याविरूद्ध वृक्षतोड कारणाऱ्याविरुद्ध, कर वसूल करणाऱ्याविरुद्ध लढा पुकारतात. ही बेकायदेशीर कामे राजेंद्रसिंह व गावकरी एक

होऊन बंद पाडतात. या संघर्षाचा सुरेखा शहांनी वेध घेतला आहे. या आदिवासी, गरीब लोकांच्या वाट्याला येणाऱ्या अनेक समस्याची, कारणमीमांसा लेखिका करतात.

राजेंद्रसिंहांनी 'जोहड' बांधल्यामुळे पाणीटंचाईपासून अनेक गावे मुक्त झाल्याने शेतात भरपूर पीक पिकल्याने तेथील लोक स्वावलंबी होतात. खाणमालकाविरूद्ध राजेंद्रसिंहांनी लढा पुकारल्यामुळे तेथील आदिवासी लोकांचा रोगापासून बचाव होतो. त्यामुळे राजेंद्रसिंहांवर खाणमालकांचा प्राणघातक हल्ला होतो. त्यात कुठेही आक्रस्ताळेपणा अथवा आक्रमकता दिसून येत नाही. जे त्यांच्या मनाला भावले, तेच 'जोहड' मधून मांडले आहे.

स्त्रियांना मोलाचे मार्गदर्शक करून त्याच्यामध्ये जागृती घडवून आणतात. आदिवासी महिलांना बचतगटासारख्या अनेक उपक्रमांची माहिती करुन देतात. अशाप्रकारे सुरेखा शहांनी राजेंद्रसिंहांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकला आहे. त्याचबरोबर तेथील आदिवासी लोकांची अशाही परिस्थितीत जीवन जगण्यासाठी चाललेली धडपड याच्यावरही प्रकाश टाकला आहे. त्याच्या लेखनात कुठेही अतिशयोक्ती नाही. अशाप्रकारे 'जोहड'मध्ये विविध आशयसूत्रे आढळून येतात.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १ | शहा सुरेखा | : | 'दै. सकाळ', सोलापूर, सोमवार २५ ऑक्टोबर, २००४ पृ. ६ |
| २ | जोगळेकर मृणालिनी | : | 'दै. सकाळ' मधुरा, पुणे, ऑक्टोबर, शनिवार १२ |
| ३ | सुनीता | : | 'समकालीन भारतीय साहित्य : साहित्य अकादमी की द्विमासिक पत्रिका,' सितंबर – अक्तूबर, २००३. पृ. १५९ |
| ४ | पाटील गंगाधर | : | 'आशयसूत्र आणि आशयसूत्र मीमांसा' अनुष्टुभ, मार्च – एप्रिल २००२. पृ. ९ |
| ५ | दीक्षित अनंत | : | 'दै. सकाळ', सोलापूर, मंगळवार १८ जून, २००२. पृ. १ |
| ६ | शहा सुरेखा | : | 'जोहड' समेरु प्रकाशन, डोंबिवली, तृ.आ. डिसेंबर, २००३, पृ. ५ |
| ७ | तत्रैव | : | पृ. ३९ |
| ८ | तत्रैव | : | पृ. ३० |
| ९ | तत्रैव | : | पृ. ४० |
| १० | तत्रैव | : | पृ. ५३ |
| ११ | शहा सुरेखा | : | 'महाराष्ट्राचे जलनायक', भाग पहिला, सुमेरू प्रकाशन, २१–२२ जानेवारी, प्र.आ. २००६ पृ. ३० |
| १२ | शहा सुरेखा | : | उनि पृ. १९९ |
| १३ | शहा सुरेखा | : | 'दै. तरुण भारत', बेळगांव, दि. १५–४–२००७ पृ. ७ |
| १४ | आर्य शची | : | 'चार गावों की कथा', तरुण भारत संघ भिकमपूरा, किशोरी प्र.स. १९९८ पृ. ४ |
| १५ | शहा सुरेखा | : | उनि पृ. ७० |
| १६ | तत्रैव | : | पृ. ७९ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | तत्रैव | : | पृ. ८६ |
| १८ | तत्रैव | : | पृ. ११३ |
| १९ | तत्रैव | : | पृ. १३२ |
| २० | तत्रैव | : | पृ. १३१ |
| २१ | कार्निक कुसुम, कपूर आनन्द | : | 'देवरी की संघर्ष गाथा' तरुण भारत संघ, भीकमपूरा, पृ. ४५ |
| २२ | शहा सुरेखा | : | उनि पृ. १६६ |
| २३ | तत्रैव | : | पृ. ६६ |
| २४ | तत्रैव | : | पृ. २२२ |
| २५ | तत्रैव | : | पृ. ९९ |
| २६ | तत्रैव | : | पृ. १०० |
| २७ | तत्रैव | : | पृ. १०२ |
| २८ | तत्रैव | : | पृ. १०३ |
| २९ | तत्रैव | : | पृ. ९१ |
| ३० | तत्रैव | : | पृ. ११४ |
| ३१ | तत्रैव | : | पृ. १६४ |
| ३२ | तत्रैव | : | पृ. १६४ |
| ३३ | तत्रैव | : | पृ. १५२ |
| ३४ | तत्रैव | : | पृ. १३८ |
| ३५ | तत्रैव | : | पृ. २१६ |
| ३६ | तत्रैव | : | पृ. १९३ |
| ३७ | तत्रैव | : | पृ. १ |
| ३८ | तत्रैव | : | पृ. १८ |
| ३९ | तत्रैव | : | पृ. १८ |
| ४० | तत्रैव | : | पृ. १०८ |
| ४१ | तत्रैव | : | पृ. १४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४२ | तत्रैव | : | पृ. १४६ |
| ४३ | तत्रैव | : | पृ. २११ |
| ४४ | तत्रैव | : | पृ. २११ |
| ४५ | तत्रैव | : | पृ. २११ |